# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक ११ मार्च, २०१५ / फाल्गुन २०, १९३६ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **गृहनिर्माण, खनिकर्म व कामगार मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - १००**

---

### अकोला महानगरपालिका हद्दीतील इमारती/सोसायटयांच्या गच्चीवर बेकायदेशीर मोबाईल टॉवर्स उभारल्याबाबत

**(१) * २९१९ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिका हद्दीतील बहुसंख्य इमारती/सोसायटयांच्या गच्चीवर इंडस या मोबाईल कंपनीने टॉवर्स उभारण्याचे काम एजन्सीला दिले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त इंडस या कंपनीने शासनाचा महसूल वाचविण्याकरिता बेकायदेशीर स्थापन करण्यात आलेल्या एजन्सींना मोबाईल टॉवर्सचे काम दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या प्रचलित नियमानुसार ज्या इमारती/सोसायटीवर मोबाईल टॉवर्स उभारावयाचे आहे ती इमारत रजिस्टर असणे गरजेचे असतांनाही त्या नियमाची पायमल्ली करुन मोबाईल टॉवर्स शाळा, हॉस्पिटल, आदिच्या जवळपास उभारण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) तद्नुसार शासनाची दिशाभूल करुन बेकायदेशीर मोबाईल टॉवर्स उभारणाऱ्या इंडस या कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ अन्वये सन २०१०-२०११ मध्ये इंडस टॉवर लि.हया कंपनीने टॉवर उभारण्याबाबतचे प्रस्ताव महानगरपालिकेकडे दाखल केले होते. परंतु आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करण्याबाबत कंपनीस कळविले असतांनाही व कुठलीही मंजूरी नसतांना कंपनीने अनधिकृतपणे टॉवर उभारणी केल्याचे आढळून आले आहे.

(२) इंटस टॉवर लि. हया कंपनीने स्वत: मोबाईल टॉवर उभारणी बाबतचे प्रस्ताव दाखल केले असल्याने टॉवर उभारणीचे काम इतर एजन्सीजला दिले असल्याबाबत स्पष्टता नाही.

(३) इंडस् टॉवर लि. या कंपनीने उभारलेल्या अनधिकृत टॉवरच्या संदर्भात महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने निश्चित केलेल्या दरानुसार कंपनीस दंड भरण्याबाबत नोटीस पाठविण्यात आली होती. तथापी कंपनीने याला प्रतिसाद न दिल्याने महापालिकेने या कंपनीचे शहरातील मोबाईल टॉवर सिल करण्याची कार्यावाही केली असता, या विरोधात कंपनीने मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. मा.न्यायालयाच्या आदेशानुसार रु. २१ लक्षचा भरणा कंपनीने केला आहे.

(४) व (५) शासनाने मोबाइल टॉवर उभारणीबाबतचे धोरण दि.०४/०३/२०१४ रोजी निश्चित केले आहे.

शासनाच्या सदर धोरणानुसार कंपनीला आवश्यक बाबीची पुर्तता करुन प्रस्ताव सादर करण्याबाबत महानगरपालिकेने सूचित केले असून त्यानुसार पुढील कार्यवाही महानगरपालिका स्तरावर करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**डहाणू (जि.पालघर) तालुक्याचा सुधारित विकास आराखडा तयार करण्याबाबत**

**(२) * ४०७२ श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.सर्वोच्च न्यायालयाने डहाणू तालुका (जि.पालघर) पर्यावरणदष्टया संवेदनशील ठरवून दोन वर्षाच्या मुदतीत विकास आरखडा तयार करण्याचे आदेश महाराष्ट्र शासनास दिलेले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने नगर विकास सचिव व संचालक, नगर रचना पुणे यांनी वीस वर्षाच्या कालावधीत विकास आराखडा तयार करूनही त्यात असंख्य चुका व त्रुटी राहिल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास उक्त प्रश्न भाग १ व २ च्या अनुषंगाने डहाणू तालुक्यातील जनतेचे होणारे मोठे नुकसान पाहता सदर विकास आराखडा सुधारित व पर्यावरणदृष्टया संवेदनशील करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्यापी, कार्यवाही वा उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन विभागाने दिनांक २०/६/१९९१ रोजीचे अधिसुचनेन्वये डहाणू तालुका जि.ठाणे पर्यावरणीयदृष्टया संवेदनशील क्षेत्र म्हणून जाहीर केले असून या क्षेत्राचा मास्टर प्लॅन किंवा रिजनल प्लॅन महाराष्ट्र शासनाने अस्तित्वातील जमीन वापर विचारात घेऊन उक्त अधिसुचनेच्या दिनांकापासून १ वर्षापर्यंत तयार करण्यात येऊन यास केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन विभागाची मान्यता घेणेबाबत नमूद आहे. याचिका क्र. २३१/९४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ३१/१/१९९५ रोजी पारित केलेल्या आदेशामध्ये सदरहू प्रदेशाचा मास्टर प्लॅन / रिजनल प्लॅन राज्य शासनाने आदेशाचे दिनांकापासून दोन महिन्याच्या मुदतीत तयार करुन, त्यास केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन विभागाची मान्यता घेणे अपेक्षित होते. त्यानुसार राज्य शासनाने डहाणू प्रादेशिक योजनेचा मसुदा दिनांक ३/५/१९९५ रोजी केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाकडे सादर केला व केंद्र शासनाने दिनांक ६/३/१९९६ रोजी या प्रादेशिक योजनेस अटींसह मान्यता दिली आहे.

तद्नंतर केंद्र शासनाने आणि सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्देश / सुचनांनुसार सदर प्रादेशिक योजना राज्य शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमांतर्गत तरतुदींनसार तयार करुन, अंतिमत: केंद्र शासनास दिनांक २८/२/२०१३ रोजी मान्यतेस्तव सादर केली आहे.

(२) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार तयार केलेली डहाणू प्रादेशिक योजना केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाकडे आवश्यक त्या मान्यतेकरीता दि. २८/२/२०१३ रोजी सादर करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे महानगरपालिका क्षेत्रातील कचऱ्यावर प्रक्रिया करणारे प्रकल्प बंद असल्याबाबत**

**(३) * ३३९७ श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेने माहे जून, २०१० पासून महानगरपालिका क्षेत्रातील कचरा डेपोत ओपन डंपिग बंद करण्याचे घोषित करून तीन वर्ष होऊनही ओपन डंपिग बंद झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऊरळी-फुरसुंगी येथील ग्रामस्थांनी याबाबत वारंवार आंदोलने केल्यानंतरही सदरचा कचरा डेपो बंद न झाल्यामुळे दिनांक १ जानेवारी २०१५ रोजी वा त्यासुमारास कचरा गाड्या अडविण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, याप्रकरणी दिनांक ८ जानेवारी २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांच्या अध्येक्षतेखाली झालेल्या बैठकीत पुढील ९ महिन्यात कचऱ्यांवर पूर्णपणे प्रक्रिया केली जाईल असे आश्वासन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पुणे येथे वॉर्ड स्तरावर प्रोसेसिंग युनिट तयार करण्याबाबत महापालिकास्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) तसेच, पुणे महापालिककेकडून कोट्यावधी रूपये खर्चून १५ क्षेत्रीय कार्यालय परिसरात पाच टन कचऱ्यांवर प्रक्रिया करण्याची क्षमता असलेले एकुण २० बायोगॅस प्रकल्पापैकी तीन बंद अवस्थेत आहेत, त्याचबरोबर नवीन सात प्रकल्पापैंकी काही प्रकल्प पूर्णत: तयार असून बंद ठेवण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने पुणे महानगरपालिका हद्दीतील कचऱ्याची समस्या कायमस्वरूपी सोडविण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) पुणे शहरातील कचऱ्याची समस्या विचारात घेऊन प्रभाग स्तरावर/क्षेत्रिय स्तरावर छोटे प्रक्रिया प्रकल्प उभारणेकरीता एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट (EOI) मागविण्यात आले असून पुढील ७ ते ८ महिन्यांत सदर प्रकल्प कार्यान्वित करण्याचे पुणे महानगरपालिकेचे नियोजन आहे.
(५) एकूण बायोगॅस प्रकल्पांपैकी दोन प्रकल्प सद्य:स्थितीत बंद असून, त्यापैकी एका प्रकल्पाचे दुरुस्तीबाबतची निविदा काढली असून पुढील तीन महिन्यांमध्ये या प्रकल्पाचे काम सुरु करण्याचे नियोजन आहे. तसेच दुसऱ्या प्रकल्पाचे ठिकाणी उंदीर व घुशींनी उपद्रव केला असल्याने त्याचीही दुरुस्ती करण्याबाबत तज्ञांचा सल्ला घेवून पुणे महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करण्यात येणार आहे.

मात्र, पूर्णत: तयार झालेला कोणताही प्रकल्प बंद ठेवण्यात आलेला नाही.
(६) पुणे महानगरपालिका हद्दीतील कचऱ्याची समस्या कायमस्वरुपी सोडविण्याकरीता पुणे महानगरपालिकेने प्रस्तावित केलेल्या उपाययोजना खालील प्रमाणे आहेत :-

(१) घनकचरा व्यवस्थापनासाठी मौजे मोशी येथील २५ हेक्टर खाणीची जागा मिळणेबाबतचा प्रस्ताव महसूल विभागाच्या विचाराधीन आहे.
(२) राडारोडा टाकणेकरीता मौजे वाघोली येथील सरकारी खाणीची जागा मिळणेबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे सादर केला आहे.
(३) मौजे पिंपरी सांडस, ता.हवेली, येथील गट नं. ४९३ मधील १९.९० हेक्टर जागा मिळणेकरीताचा प्रस्ताव वन विभागाच्या विचाराधीन आहे.

(४) पुणे महानगरपालिका या ठिकाणी शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया प्रकल्प व भूभराव करणार असल्याने यापासून स्थानिक ग्रामस्थांना कोणताही त्रास होणार नाही, याची दक्षात घेवून कार्यवाही करण्यात येणार आहे.

(५) घनकचऱ्यावर प्रक्रिया करण्याच्या क्षमतेत वाढ करण्यासाठी एकूण १०५० मे.टन (अनुक्रमे २५०, ३०० व ५०० मे. टन क्षमतेचे ३ प्रकल्प) क्षमतेच्या प्रकल्पांना कार्यादेश देण्यात आले असून, सदर प्रकल्प पुढील २४ महिन्यांत कार्यान्वित होणार आहेत.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भिवंडी निजामपूर महानगरपालिकेने शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोगाची थकबाकी दिली नसल्याबाबत**

**(४) * ३२४९ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभागाच्या प्राथमिक शाळांची संख्या किती आहे,

(२) या शाळांमध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांची व अध्यापन करणा-या मान्यताप्राप्त शिक्षकांची संख्या किती आहे,

(३) शासनाच्या दिनांक १२ मार्च, २०१० च्या शासन निर्णयानुसार नगरपालिका, महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षकांना दिनांक १ मार्च, २००६ पासून ६ वा वेतन आयोग लागू केला असता भिवंडी निजामपूर पालिकेने मात्र शिक्षकांच्या सुमारे १३ कोटी ३७ लाख रुपयांच्या पगाराची थकबाकी दिली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, दिनांक १ जानेवारी, २००६ पासूनची थकबाकी व नियमित वेतनसुध्दा वेळेवर न देण्याची कारणे काय आहेत,

(५) याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त शिक्षकांच्या वेतनाची थकबाकी त्वरीत देण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) तसेच सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांनासुध्दा ६ व्या वेतन आयोगाची अंमलबजावणी व थकबाकी देणे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्राथमिक शाळांची संख्या १०२ इतकी आहे.

(२) विद्यार्थ्यांची संख्या ३४,५४० इतकी असून अध्यापन करणा-या शिक्षकांची संख्या ८६४ इतकी आहे.

(३), (४) व (५) होय.

भिवंडी महानगरपालिकेची आर्थिक स्थिती समाधानकारक नसल्याने सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार महानगरपालिकेच्या ५० टक्के हिश्याची रक्कम १३ कोटी ३७ लाख रुपयांच्या पगाराची थकबाकी अदा करता येऊ शकली नाही अशी वस्तुस्थिती आहे. सदर वस्तुस्थिती विचारात घेऊन आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत वाढवून सदर रकमा सत्वर प्रदान करण्याबाबत महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे.

(६) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीच्या कारणास्तव सेवानिवृत्त शिक्षकांच्या वेतनाची थकबाकी देणे प्रलंबित आहे हे ही खरे आहे.

-----------------

**ठाणे महानगरपालिकेने मराठी माध्यमाच्या शाळा बंद केल्याबाबत**

**(५) * ३५३१ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण विभागाच्या निर्णयानुसार ज्या शाळांची पट संख्या २० पेक्षाही अधिक आहे अशा शाळा शासन धोरणानुसार बंद करता येत नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे महानगरपालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांची पट संख्या २० पेक्षा अधिक असूनदेखील ठाणे मनपाच्या शिक्षण विभागाने मागील ७ वर्षात अनेक शाळा बंद करून सन २०१४ मध्ये म्हणजे गतवर्षी आणखी ७ मराठी शाळा बंद करण्यात आलेल्या असल्याचे दिनांक २१ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) तसेच त्याबाबतची तक्रार निवेदने ठाणे येथील प्राथमिक शिक्षण संघटनेच्या प्रतिनिधींनी निवेदनाद्वारे ठाणे महानगरपालिका आयुक्त तसेच सचिव, शालेय शिक्षण विभाग व प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग यांचेकडे त्याचसुमारास म्हणजे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये सादर केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली काय, त्यात काय निष्पन्न झाले,

(५) त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली अथवा येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) हे खरे नाही. तथापि, सन २०१० मध्ये ६ आणि सन २०१३ मध्ये ५ शाळा त्या इमारतीत असणा-या इतर शाळांमध्ये विलीनीकरण करण्यात आल्या असून सन २०१४-१५ मध्ये एकही शाळा विलीनीकरण करण्यात आली नाही.

(३), (४) व (५) या आशयाचे निवेदन ठाणे महानगरपालिका वा शासनाकडे प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले नसल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र सदनाच्या बांधकामात झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत**

**(६) * २८१६ डॉ.अपूर्व हिरे** :सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र सदनाबरोबरच अन्य कामांत कंत्राटदारांकडूनच लाच घेतल्याप्रकरणीच्या आरोपांची अंमलबजावणी संचालनालय (ईडी) व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्या प्रमुखांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथक (एस.आय.टी) स्थापन करून दोन महिन्यात चौकशी करावी, व प्रगती अहवाल सादर करण्याचे आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक १८ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याचिकाकर्त्यांनी केलेल्या तक्रारी व सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे सदरील चौकशीचे कामकाज पूर्ण झाले आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, सदरहू चौकशी मुदतीत पूर्ण न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत व ती केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) या प्रकरणाबाबतची चौकशी सध्या सुरु आहे.
(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाप्रमाणे चौकशी अहवाल बंद लखोटयात न्यायालयात सादर करण्यात येणार असून सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

-----------------

**मुंबईतील जलवाहिन्या तसेच विविध प्रकारच्या केबल वाहिन्या यांच्या दुरुस्तीसाठी रस्त्यावर केलेले खोदकाम**

**(७) * ३८०० श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.राजेंद्र मुळक, श्री.सुनिल तटकरे, श्री.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील अनेक रस्ते आणि पदपथाखालून जलवाहिन्या तसेच विविध प्रकारच्या सेवा पुरविणाऱ्या केबल वाहिन्या जात असून त्यांच्या दुरुस्तीसाठी संबंधित कंपन्याकडून रस्त्यावर खोदकाम केले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या खोदकामामुळे वाहनचालक व पादचा-यांना अडथळा निर्माण होवून अनेक छोट्या मोठ्या अपघातांच्या प्रमाणात वाढ होत असल्याने या संबंधात चौकशी केली आहे काय,
(३) तसेच, खोदकाम केलेले हे रस्ते व चर बुजविण्याचे काम करण्यासाठी सन २०१३ मध्ये ७० कोटी रुपयांची मान्यता घेवून प्रत्यक्षात २७० कोटी रुपये खर्च करुन यात मोठया प्रमाणात गैरव्यवहार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार चौकशीत दोषी आढळून आलेल्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप, कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेने चरांचे पृष्ठीकरण करण्यासाठी धोरण निश्चित केले असून प्रस्तुत धोरणामध्ये रस्त्यावर खोदकाम करताना अथवा रस्त्याचे पुनर्पृष्ठीकरण करतांना सदर उपयोगिता सेवा पुरविणा-या अर्जदाराने तथा पुनर्पृष्ठीकरणाचे काम करणा-या ठेकेदाराने पादचाऱ्यांच्या व वाहतुकीच्या सुरक्षेकरिता पालन करावयाच्या कडक उपाययोजना समाविष्ट केलेल्या आहेत. सदर उपाययोजनांची तंतोतंत अंमलबजावणी करण्यात येत असल्यामुळे व अशा प्रकारच्या अंमलबजावणी अभावी तुरळक प्रकरणे वगळता, अपघात होत असल्याचे महानगरपालिका प्रशासनाच्या निदर्शनास आलेले नसल्याने चौकशी करण्यात आलेली नाही.
(३) रस्ते व चर बुजविण्याच्या कामामध्ये गैरव्यवहार झाला नसून, सदर कामाच्या ठेकेदारांच्या किंमतीमध्ये झालेले फेरबदल हे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या मंजुरीने केले आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अलिबाग येथील आक्षी साखर खाडीतील गाळामुळे नुकसान झालेल्या बोटींना भरपाई मिळणेबाबत

**(८) * ३८८० श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग-आक्षी साखर खाडीतील (ता.अलिबाग, जि.रायगड) गाळ काढण्याबाबत गेल्या ३ वर्षांपासून शासनाकडे संबंधीत मच्छिमार व्यावसायीक तसेच लोकप्रतिनिधींकडून मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने आजतागायत गाळ न काढल्यामुळे मच्छिमार बोटींचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याने याची भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) आक्षी साखर खाडीतील गाळ काढण्यासाठी आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांनी ०२ मार्च, २०१५ रोजी पाठविलेला निधीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

बोटींचे नुकसान झालेल्या मच्छिमारांना भरपाई देण्याच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**पुणे महापालिकेच्या झोपडपट्टयांमधील मुलांना संगणकाचे प्रशिक्षण देण्यासाठी सहा बसेस पैकी केवळ एकाच बसचा वापर होत असल्याबाबत**

**(९) * ३६९३ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महापालिकेच्या झोपडपट्टयांमधील मुलांना त्यांच्या घरापर्यंत जाऊन संगणकाचे प्रशिक्षण देण्यासाठी योजनेची सुरूवात करण्यासाठी १३ लाख रुपये खर्च करून सुसज्ज अशा संगणक प्रयोगशाळा असलेल्या सहा बसेस पैकी केवळ एकाच बसचा वापर सद्य:स्थितीत होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार खरेदी केलेल्या सर्वच संगणक बसचा वापर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुणे महानगरपालिकेने फिरत्या स्वरुपातील संगणक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यासाठी शरद संगणक योजनेअंतर्गत ६ संगणकयुक्त मोबाईल बस खरेदी केल्या असून, त्या स्वयंसेवी संस्थाकडे सुपूर्द करण्यात आल्या होत्या. तथापि, संगणकयुक्त मोबाईल बसद्वारा प्रशिक्षण आयोजित करणे आर्थिक दृष्टया परवडत नसल्याने ५ संस्थांनी या बसेस पुणे महानगरपालिकेकडे परत जमा केल्या आहेत. सद्य:स्थितीत या योजनेअंतर्गत एकच संगणकयुक्त मोबाईल बसचा वापर होत आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(२) पुणे महानगरपालिकेतर्फे याबाबतीत सर्वकष माहिती घेण्यात आली असून, संगणकयुक्त मोबाईल बसेसद्वारे पुन्हा प्रशिक्षण सुरु करण्याकरिता कार्यवाही सुरु आहे.

(३) संगणकयुक्त मोबाईल बसद्वारा स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने प्रशिक्षण आयोजित करण्याकरिता प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस प्रतिसाद न मिळाल्याने दिनांक १८.१.२०१५ रोजी फेर जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून, या जाहिरातीनुसार झेन्सॉर कंपनी, पुणे यांचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे. या योजनेअंतर्गत अधिक संस्थांचे प्रस्ताव प्राप्त होण्याकरिता दिनांक ५.३.२०१५ रोजी पुन्हा जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. संगणकयुक्त मोबाईल बस द्वारा प्रशिक्षण आयोजित करणे करिता बसेसचे नुतनीकरण करणेत येत असून, प्रशिक्षण आयोजित करणेचे नियोजन आहे.

(४) वरीलप्रमाणे कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## पुणे जिल्हा न्यायालयात पुरेसे न्यायाधिश उपलब्ध नसल्याबाबत

**(१०) * ३२८२ श्री.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा न्यायालयात पुरेसे न्यायाधिश उपलब्ध नसल्याने गेल्या १५ वर्षापासूनचे हजारो खटले प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्हा न्यायालयात न्यायाधिशांची संख्या वाढविण्यासाठी किंवा १५ वर्षापासूनचे प्रलंबित खटले निकाली काढण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, त्याबाबतचा तपशिल उपलब्ध आहे काय,

(४) सदर, तपशिल उपलब्ध नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

जिल्हा न्यायालय, पुणे येथे एकूण मंजूर न्यायाधीशांची संख्या-१३३, भरलेली पदे-१३३, रिक्त पदे-००.

पुणे जिल्हा न्यायालयात १५ वर्षापासून प्रलंबित खटले.

| दिवाणी | फौजदारी | एकूण |
|---|---|---|
| २४३५ | ७४९२ | ९९२७ |

(२) व (३) पुणे जिल्हा न्यायालयात मंजूर न्यायाधिशांची सर्व म्हणजेच १३३ पदे भरण्यात आलेली आहेत. त्यामुळे न्यायाधीशांची संख्या वाढविण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

पाच वर्षापेक्षा जून्या खटल्यांपासून मुक्त अशी न्याय यंत्रणा बनवण्यासाठी मा.उच्च न्यायालयाने सूचना दिल्या आहेत. मा.समिती ही जिल्हा व सत्र न्यायालयातील जुन्या फौजदारी खटल्यांबाबतची (५ वर्षापेक्षा जास्त कालावधीकरिता प्रलंबित असलेल्या) माहिती आणि दोन वर्षापेक्षा जास्त कालावधीकरिता तुरुंगात असलेल्या आरोपींबाबतच्या फौजदारी खटल्यांचा जलद निपटारा करण्याच्या दृष्टीने नियंत्रण करते.

मा.नामदार उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडील वेळोवेळी प्राप्त झालेल्या निर्देशांनुसार पुणे जिल्ह्यात मागील १ वर्षात साधारणत: लोकन्यायालये, राष्ट्रीय लोक अदालती, स्पेशल ड्राईव्ह घेऊन प्रलंबित खटल्यांची संख्या कमी करण्याचा प्रयत्न केला जातो व पुढेपण केला जाणार आहे. तसेच तालुक्यात असलेल्या न्यायालयांतही मेडीएटर न्यायाधीशांची नेमणूक करुन प्रलंबित प्रकरणे निकाली काढली जातात. वेळोवेळी सर्व न्यायिक अधिकाऱ्यांना परिपत्रके काढून जुनी प्रलंबित प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढण्याचे निर्देश वेळोवेळी दिलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मेट्रो रेल्वेचे तिकीट दर निश्चित करण्याबाबत

**(११) * ३९९०  श्रीमती विद्या चव्हाण, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर दरम्यान मेट्रो रेल्वे प्रकल्प राबविणाऱ्या रिलायन्स कंपनीचे मेट्रो रेल्वेचे तिकीट दर निश्चित करणारी समिती स्थापन करण्यास केंद्र सरकारने टाळाटाळ करुन मेट्रोसाठी १०, ३०, व ४० रुपये असे तिकीट दर आकारण्यास मंजूरी दिली असल्याचे माहे, जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तिकीट दरात मोठ्या प्रमाणात वाढ करण्यास मा.उच्च न्यायालयानेही मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मेट्रो रेल्वेच्या तिकीटाचे दर निश्चित करण्यासाठी समिती स्थापन करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर तिकीट दरवाढ सामान्य नागरिकांना आर्थिक दृष्ट्या परवडत नसल्याने ती कमी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) उच्च न्यायालयाने मुंबई मेट्रो वन प्रा.लि. (मेट्रो रेल्वे प्रशासन) यांना मेट्रो रेल ॲक्ट, २००९ नुसार दर निश्चिती करण्यास मंजूरी दिली आहे. केंद्र शासनामार्फत दर निश्चिती समिती स्थापन करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) उच्च न्यायालयाने मुंबई मेट्रो वन प्रा.लि. (मेट्रो रेल्वे प्रशासन) यांना मेट्रो रेल ॲक्ट, २००९ नुसार दर निश्चिती करण्यास मंजूरी दिली आहे.

(३) होय.

(४) महाराष्ट्र शासनाच्या दिनांक ३ सप्टेंबर, २०१३ च्या निर्देशाप्रमाणे मेट्रोचे तिकीट दर निश्चित केलेले आहेत व त्याची अंमलबजावणी करण्याकरीता सर्वोच्च न्यायालयामध्ये कार्यवाही चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांताक्रुझ मुंबई येथील जोडरस्त्याच्या रुंदीकरणासाठी कुर्ला येथील नेताजी नगर मधील सदनिकाधारकांना घरे उपलब्ध करून देण्यासाठी करावयाची उपाययोजना

**(१२) * ३५५२ श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील, श्री.प्रकाश गजभिये, श्री.विक्रम काळे, श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग : तारांकित प्रश्न क्रमांक १६९६ ला दिनांक ११ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांताक्रुझ मुंबई जोडरस्त्याच्या रुंदीकरणासाठी कुर्ला येथील नेताजी नगर को.हौ.सोसायटी इमारत क्र.२ व ३ मधील ६४ सदनिकांसह दोन्ही बाधित होणाऱ्या इमारतीचा ताबा शासनाने दिनांक १० नोव्हेंबर, २०११ रोजी वा त्या सुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या इमारतीत राहणाऱ्या सदनिकांधारकांचे पुनर्वसन भारतनगर वांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा पूर्व, मुंबई येथे न.भू.क्र. ७६४३ पै व ४२०७ पै. या स्वतंत्र भूखंडावर कायमस्वरुपी नियोजित प्रस्तावित इमारतीमध्ये ४८५ चौ.फूटाची सदनिका देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हेही खरे आहे काय,

(३) परंतु, अद्यापी या सदनिकाधारकांना घरे उपलब्ध करून देण्यात आली नाहीत, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यांत आली आहे काय,

(५) असल्यास, त्यात काय आढळून आले व या बाधित सदनिकांधारकांना घरे उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यांत येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याच्या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या प्रश्नाधीन इमारतींचा ताबा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने माहे नोव्हेंबर, २०११ मध्ये घेतला आहे. प्रश्नाधीन इमारतीच्या सदनिकाधारकांनी मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिका प्रकरणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मा.उच्च न्यायालयाला सादर केलेल्या शपथपत्रानुसार सदनिकाधारकांचे पुनर्वसन भारत नगर, बांद्रा-कुर्ला संकुल येथील न.भू.क्र. ७६४३ पै व ४२०७ पै या भूखंडावरील मेसर्स एचडीआयएल या विकासकामार्फत विकसित करावयाच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये स्वतंत्र भूखंडावरील नियोजित इमारतीमध्ये ४५० चौरस फुट कार्पेट क्षेत्राच्या सदनिका कायम स्वरुपी देण्याचे कबूल केले होते. तसेच सदनिकाधारकांची ४८५ चौ. फुटाच्या सदनिकांची मागणी राज्य शासन व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या मान्यतेच्या अधीन राहून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून विचारात घेण्याचे नमूद केले होते.

(३), (४) व (५) सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या भूखंडावर वसलेल्या पात्र रहिवाश्यांचे तात्पुरते पुनर्वसन करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने खाजगी विकासकला तात्पुरत्या स्वरुपात वापरण्यासाठी सदनिका उपलब्ध करुन देऊनही त्यांचे तात्पुरते पुनर्वसन करुन भूखंड मोकळा करण्यात खाजगी विकासकाला यश आलेले नाही. तसेच सदर योजनेच्या

अंमलबजावणीबाबत रहिवाश्यांनी म्हाडाकडे केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने सदर योजनेस स्थगिती दिल्याने पुढील कार्यवाही होऊ शकली नाही. यामुळे खाजगी विकासकाने योजनेच्या अंमलबजावणीची सुरुवात व पुर्णत्व केव्हा होईल याचे वेळापत्रक देता येणार नाही, असे कळविले आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. मूळ प्रस्तावानुसार संबंधित सदनिकाधारकांचे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्याकरीता विविध प्रयत्न करण्यात आले आहेत. तसेच या संबंधीची वस्तुस्थिती आणि उपलब्ध पर्याय मा.उच्च न्यायालयाला शपथपत्राव्दारे सादर करण्यात आले आहेत. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाव्दारे सदर सदनिकाधारकांचे अद्याप कायमस्वरुपी पुनर्वसन झाले नसले तरी प्राधिकरणाने सदर सदनिकाधारकांना पर्यायी जागेसाठी आगाऊ भाडे दिले असून त्यामध्ये सदनिकाधाराकंच्या मागणीनुसार वाढही करण्यात आली आहे. मा.न्यायालयात प्राधिकरणाकडून प्रतिज्ञापत्राव्दारे सूचविलेल्या पर्यायाच्या अनुषंगाने म्हाडाकडून मुलुंडयेथील तयार सदिनका विकत घेऊन त्यामध्ये पुनर्वसन करण्यासंबंधी सदनिकाधारकांनी सहमती दर्शविली असून त्यानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून दिनांक ०२.०३.२०१५ च्या पत्राव्दारे सदर प्रस्ताव म्हाडाला सादर करण्यात आला आहे.

-----------------

**विविध सरकारी कामांसाठी लागणाऱ्या दस्त ऐवजांचे अर्जदाराने स्व साक्षांकन करण्याच्या पध्दतीस प्रोत्साहन देण्याबाबत**

**(१३) * ३४६४ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विविध सरकारी कामांसाठी लागणाऱ्या दस्त ऐवजांचे नोटरीकडून अथवा राजपत्रित अधिकाऱ्यांकडून साक्षांकन करुन घेण्याऐवजी अर्जदाराने अशा दस्तऐवजांचे स्व साक्षांकन करण्याच्या पध्दतीस प्रोत्साहान देण्याची केंद्र शासनाने राज्य सरकारला सुचना केल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या शिफारशीनुसार राज्य सरकारकडून उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) स्व घोषणापत्र स्वीकारण्यासंदर्भात माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत शासन निर्णय क्र. एम एच - ९०२१/११/२०१३. डीआयटी (एमएच) /३९, दिनांक १४.०८.२०१३ निर्गमित करण्यात आला आहे. तसेच स्व साक्षांकन आणि स्व घोषणापत्र स्विकारणेबाबत सविस्तर शासन निर्णय लवकरच निर्गमित करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**माथेरान नगरपालिकेमार्फत १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना वाहतुकीची सोय उपलब्ध करण्याबाबत**

**(१४) * ३३८० श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माथेरान नगरपालिकेमार्फत आरटीई ॲक्ट २००९ नुसार १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना वाहतुकीची सोय उपलब्ध करुन देणे स्थानिक प्रशासनास बंधनकारक असताना माथेरान येथील शेकडो विद्यार्थ्यांना वाहतुकीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माथेरान या पर्यटन स्थळी १९५९ पासून वाहन बंदी असल्याने सदर विद्यार्थ्यांना पर्यावरण पूरक वाहतूक व्यवस्था उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक प्रशासन आणि शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, त्याचे स्वरुप काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाच्या दिनांक ०४.०२.२००३ च्या अधिसूचनेनुसार माथेरान हे पर्यटन स्थळ अतिसंवेदनशिल क्षेत्र म्हणुन घोषित असल्याने येथे वाहनबंदी आहे.

या पार्श्वभूमीवर शिक्षण हक्क कायद्यानुसार विद्यार्थ्यांसाठी पर्यावरणपुरक वाहतुक व्यवस्थेबाबतचा प्रस्ताव नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या मंजुरीअंती केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी माथेरान नगरपरिषदेमार्फत तातडीने पाठविण्यात येईल.

-----------------

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) च्या धर्तीवर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) स्थापन करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय**

**(१५) * ३१९४ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) च्या धर्तीवर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) स्थापन करण्याचा निर्णय शासनाने माहे नोव्हेंबर, २०१४ च्या शेवटच्या सप्ताहात घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयानुसार शासनाने आतापर्यंत याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) पुणे महानगर प्रदेश विकाय क्षेत्र निश्चित करुन ते अधिसूचनेद्वारे जाहिर करणे व त्या क्षेत्राकरीता क्षेत्र विकास प्राधिकरण गठित करणे यासंदर्भात शासनस्तरावर निर्णय घेण्याची प्रक्रिया सुरु असून लवकरच निर्णय अपेक्षित आहे..
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याचा होत असलेला प्रयत्न**

**(१६) * ३०४१ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी असून सर्वात मोठी बाजार पेठ असलेल्या मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्यासाठी मा.पंतप्रधान यांच्या अध्यक्षेतेखाली विशेष समितीची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईला महाराष्ट्रपासून तोडण्याचा होत असलेला प्रयत्न रोखण्याबाबत मुंबईकरांनी रस्त्यावंर उतरून तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईला महाराष्ट्रपासून तोडण्याचा होत असलेला प्रयत्न रोखण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गेवराई (जि.बीड) शहरातील झोपडपट्टी धारकांचे अतिक्रमण नियमाकुल करण्याबाबत**

**(१७) * ३६७० श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गेवराई (जि.बीड) शहरातील संजयनगरसह इतर भागातील झोपडपट्टी धारकांची अतिक्रमण नियमाकुल करण्याची मागणी लोकप्रतिनिधीसह सामाजिक संघटनांकडून होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन निर्णयातील तरतुदीनुसार दिनांक १ जानेवारी, १९९५ पूर्वीच्या झोपडपट्टी धारकांचे अतिक्रमण नियमाकुल करण्यासाठी आवश्यक प्रमाणपत्र रहिवाशांना नगर परिषद गेवराई यांनी अद्याप दिले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त रहिवाशांचे अतिक्रमण नियमाकुल करण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे,

(४) शहरातील झोपडपट्टी धारकांचे अतिक्रमण नियमाकुल करण्यासाठी होत असलेल्या विलंबास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द शासन कोणती कार्यवाही करणार आहे,
(५) उक्त झोपडपट्टी धारकांचे अतिक्रमण केव्हा नियमाकुल होणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) नाही. दि.१ जानेवारी, १९९५ पूर्वीच्या ३६६ अतिक्रमण धारकांना प्रमाणपत्र दिलेले आहे.
(३) तहसील कार्यालयामार्फत जिल्हाधिका-यांकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) जिल्हाधिकारी कार्यालयातील कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**मुंबईतील म्हाडाच्या मास्टर लिस्टमधील घरांसाठी पुरावे सादर करताना अनेकांनी बोगस कागदपत्र सादर केल्याबाबत**

**(१८) * ३७७७ श्री.विजय गिरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.राजेंद्र मुळक :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील संक्रमण शिबीरातील मूळ रहिवाशांना हक्कांची घरे देण्यासाठी मास्टरलिस्ट तयार करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मास्टरलिस्ट अंतर्गत ८०० अर्जदार अपात्र झाले असून या अपात्र अर्जदारांमध्ये बोगस व्हेकेशन नोटीस तयार करुन म्हाडाची घरे लाटण्याचा प्रयत्न दलालांनी केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दलालांनी घरांसाठी पुरावे सादर करताना बनावट मतदार ओळखपत्र, आधारकार्ड, पॅनकार्ड आणि वीज बिल सादर केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार बोगस पुरावे म्हाडाला सादर करणा-यांवर व बोगस पुरावे देणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) होय.
(२), (३), (४) व (५) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या सुनावणी दरम्यान काही अर्जदारांनी सादर केलेली कागदपत्रे संशयास्पद असल्याचे निदर्शनास आले आहे. सखोल चौकशी करण्यासाठी एकूण ५१ प्रकरणे मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी / प्राधिकरण यांच्याकडे पाठविण्यात आलेले आहेत. त्यामुळे त्यांना बृहतसुचीवरुन गाळे वितरणासाठी अपात्र ठरवून प्रस्तुत प्रकरण मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी / प्राधिकरण यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधित अर्जदाराविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

-----------------

**औरंगाबाद शहरास पाणीपुरवठा करणाऱ्या ३०० एम.एल.टी. ऐवजी**
**१०० एम.एल.टी. ची पाणीपुरवठा योजना राबविल्याबाबत**

**(१९) * ३९३२ श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.संदिप बाजोरिया, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जायकवाडीपासून औरंगाबाद शहरात ३०० एम.एल.टी.पाणी आणण्याचा करार मनपाने समांतर जलवाहिनीचे काम करणा-या औरंगाबाद सिटी वॉटर युटीलीटी कंपनी सोबत केला असला तरीही कंपनी फक्त १०० एम.एल.टी.चीच योजना करणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समांतरची १०० एम.एल.टी.चीच योजना कार्यान्वीत होणार असल्याने शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागणीनुसार ३०० एम.एल.टी.पाणी देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. औरंगाबाद महानगरपालिकेने सन २०४१ करीता समांतर जलवाहिनी योजनेचे संकल्पन केले असून, अस्तित्वातील योजनेतून प्राप्त होणारे पाणी परिमाण वगळता ३२४ एम.एल.डी. पाणी पुरवठा दररोज होईल असे समांतर जलवाहिनी प्रकल्पाचे नियोजन केलेले आहे. त्यानुसार निविदा कार्यवाही होऊन औरंगाबाद महानगरपालिकेने सवलतधारकासोबत सवलत करारनामा केलेला असून त्यानुसार प्रकल्पाची कामे करणे सवलतधारकास बंधनकारक आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतून वगळलेल्या २७ गावात**
**बिल्डरांनी केलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत**

**(२०) * २६४८ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बिनशेती विभागाने काही दिवसांपूर्वी कल्याण तालुक्यातील नांदिवली, पंचानंद, गोळवली ग्रामपंचायत हद्दीत तसेच, अंबरनाथ तालुक्यातील १६ गावांचे सर्वेक्षण केले असता कोणतीही परवानगी नसताना काही बिल्डरांनी अनधिकृत इमारती व चाळीचे बांधकामे उभारली असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात व त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त ग्रामपंचायत तसेच, कल्याण तहसिलदार कार्यालयाच्या अंतर्गत येणाऱ्या इतर ग्रामपंचायती हद्दीत तसेच अंबरनाथ तालुक्यात एकूण किती इमारती व चाळीची बांधकामे उभारण्यात आलेली आहेत व त्यापैकी किती अवैध बांधकामे निष्कासीत करण्यात आलेली आहेत,
(३) सदरहू अवैध बांधकामे निष्कासित करण्यास विलंब करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून आणि नियमबाह्य बांधकाम करणाऱ्या बिल्डरांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, असल्यास, चौकशीनुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप अवैध बांधकामाविरोधात कारवाई करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) तहसिलदार बिनशेती पथकाने केलेल्या शोध मोहिमेत सुमारे २८० अनधिकृत बांधकामे आढळली आहेत. नियमबाह्य बांधकाम करणाऱ्या बांधकामधारकांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४५ (२) प्रमाणे दंडाच्या नोटीसा जिल्हाधिकारी, ठाणे यांच्यामार्फत बजावणेत आलेल्या असून पुढील कार्यवाही सुरु आहे. तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम, १९६६ अन्वये सदर बांधकामाची तपासणी करुन कार्यवाही करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर प्रगतीत आहे.

-----------------

**खामगांव व शेगांव क्षेत्रातील (जि.बुलडाणा) उपविभागीय अधिकारी कार्यालयाअंतर्गत पोलिस पाटलांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(२१) * ४०३५ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलडाणा जिल्हयातील खामगांव व शेगांव क्षेत्रातील उप विभागीय अधिकारी, कार्यालयाअंतर्गत येणाऱ्या पोलिस पाटलांची ६० पदे रिक्त आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भरती प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश असतांना सुध्दा अद्याप पर्यंत प्रक्रिया सुरू न करण्याचे कारणे काय आहेत,
(३) सदरहू नियुक्त्या करण्याबाबत उपविभागीय अधिकारी, खामगांव यांना तात्काळ आदेश देण्यात येणार आहेत काय
(४) अद्याप कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बुलढाणा जिल्हयातील खामगाव उपविभागातील खामगाव व शेगाव तालुक्यांमध्ये सध्या ७८ पोलीस पाटलांची पदे रिक्त आहेत.

(२) व (३) पोलीस पाटील भरती प्रक्रियेस दि. २५.२.२०१३ पासून दिलेली स्थगिती दि. २७.८.२०१४ रोजी उठविण्यात आली, तद्नंतर संबंधित उपविभागीय अधिकारी यांना पोलीस पाटील भरती प्रक्रीया राबविण्याबाबत जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी दि. २.९.२०१४ व दि. १.१.२०१५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. खामगाव उपविभागातील भरती प्रक्रीया पूर्ण करण्याच्या अनुषंगाने बिंदुनामावली अद्ययावत करण्याचे काम सुरु असून ती अद्ययावत होताच होताच पालीस भरती प्रक्रिया सुरु करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक येथील गोदावरी नदीकाठी झालेले अतिक्रमण व जलप्रदुषण दुर करणेबाबत**

**(२२) * २८७४ डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, डॉ.अपूर्व हिरे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथील गोदावरी नदीकाठी झालेली अतिक्रमणे आणि नदीचे पाणी मोठ्या प्रमाणात दुषित झाल्याने गोदावरी नदीची दुरवस्था झाल्याचे अखिल भारतीय आखाडा परिषदेचे अध्यक्ष यांनी पाहणी करुन दिनांक ७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आणले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिक येथे गंगा नदीच्या धर्तीवर गोदावरी नदीचे जल प्रदुषण दुर करण्याच्या अनुषंगाने कृती आराखडा तयार करण्याचे सुतोवाच पालकमंत्री (नाशिक जिल्हा) यानी दिनांक ८ जानेवारी २०१५ रोजी वा त्यासुमारास केले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, नाशिक आणि गोदावरी नदीचे धार्मिक महत्व लक्षात घेवून गोदावरी नदीत येवून मिळणारे गटारीचे सांडपाणी नदीत येवू न देता ते बाहेर काढण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्याबाबत मा.जिल्हाधिकारी, नाशिक यांना सुचना देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, गोदावरी नदी प्रदुषण मुक्तीसाठी प्रयत्नाची आवश्यकता असताना बोटीद्वारे नदीपात्रातील निर्माल्य, शेवाळ तसेच पानवेली काढण्याचे काम थांबविण्यात आले त्यामुळे नदी पात्रात पुन्हा पाणवनस्पती वाढत आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, गोदावरी नदीचे प्रदुषण वाढल्याने पाणी दुषित होवून त्याद्वारे आजार पसरत असल्याचे निदर्शनास आल्याने आगामी सिंहस्थ कुंभमेळा होणे कठीण आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, गोदावरी नदी काठावरील अतिक्रमणे दूर करून तसेच नदी पत्रातील निर्माल्य, पाणवनस्पतीचे निर्मुलन करून प्रदूषण मुक्त नदी होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) होय.

(४) व (५) नाही.

(६) अतिक्रणे वेळोवेळी काढण्यात येतात.

जलप्रदुषणासंदर्भात राष्ट्रीय हरित लवादाच्या आदेशानुसार त्र्यंबक नगरपरिषदे मार्फत कार्यवाही करण्यात येत आहे. नाशिक महानगरपालिका तर्फे निर्माल्य संकलनासाठी निर्माल्य कलश ठेवण्यात आले आहेत तसेच NEERI या संस्थेच्या मार्गदर्शनासाठी विविध दिर्घ मुदतीच्या व तातडीच्या उपाययोजना हाती घेतल्या आहेत.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महागाव (जि.यवतमाळ) येथील पोलीस निवासस्थानाच्या दुरुस्तीवर खर्च दाखवून अपहार केल्याबाबत**

**(२३) * ३४२८ श्री.संदिप बाजोरिया, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागाव (जि.यवतमाळ) येथील पोलिसांच्या निवासस्थानाचा खर्च दोन-तीन वर्षांनी लाखो रुपये दाखविले जातो तथापि प्रत्यक्षात खर्च केला जात नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पोलीस निवासस्थानाच्या दुरुस्तीवर खर्च दाखवून अपहार करणाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) असे निदर्शनास आले नाही.

(२), (३), व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वरळी (जि.मुंबई) येथील लव्हग्रोव्ह पंपिंग स्टेशनसाठी दिलेली रक्कम कंत्राटदाराने परत केली नसल्याबबात**

**(२४) * ४१३७ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी (जि.मुंबई) येथील लव्हग्रोव्ह पंपिंग स्टेशनचे ८९ कोटी ६३ लाख रुपयांचे कंत्राट युनिटी कन्सोरशियम या कंत्राटदाराला माहे नोव्हेंबर, २००७ मध्ये देण्यात आले असून या कामापोटी कंत्राटदाराला ५७ कोटी ३० लाख अदा करण्यात आले परंतू पुढे ते काम करणे अशक्य झाल्याने सदरील रक्कम कंत्राटदाराने अद्यापपर्यंत परत केली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील प्रकल्पावर माहे सप्टेंबर, २०१३ अखरे ११७५ कोटी ७२ लाख मंजूर प्रकल्प किंमतीऐवजी प्रत्यक्षात १,७६४ कोटी ५५ लाख खर्च झाले असून प्रकल्पांतील एकूण ५८ कामांपैकी फक्त १६ कामे (२७.६ टक्के) पूर्ण झाली असून प्रकल्पाची सुधारित किंमत ३८८४ कोटी ६१ लाख रुपये असून २७०८ कोटी ८९ लाख एवढा वाढीव खर्च होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग एक व दोन बाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

वरळी (जि.मुंबई) येथील लव्हग्रोव्ह पंपिंग स्टेशनचे ८९ कोटी ६३ लाख रुपयांचे कंत्राट युनिटी कन्सोरशियम या कंत्राटदाराला माहे नोव्हेंबर, २००७ मध्ये देण्यात आले आहे. सदर प्रकल्पाच्या मूळ आराखडयानुसार प्रशासकीय इमारतीच्या पाईल फाऊंडेशनच्या कामाकरीता कंत्राटदारास रुपये ५७,२९,८७४/- इतकी रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

सदर प्रकल्पाची नियोजित जागा काही तांत्रिक गरजेपोटी बदलण्यात आल्याने सुधारीत प्रकल्प आरखडयानुसार लगतची नवीन जागा उपलब्ध करण्यात आलेली आहे. त्यानुसार कंत्राटदारास मूळ कंत्राटात फेरबदल करुन नवीन कार्यादेश देताना रु.५७,२९,८७४/- इतकी रक्कम वजा करण्यात आलेली आहे.

(२) ब्रिमस्टोवॅड प्रकल्पाची मूळ प्रकल्प किंमत रुपये १२०० कोटी असून त्यास केंद्र सरकारकडून मंजूरी मिळालेली आहे. त्यापैकी आजतागायत केंद्र शासनाकडून रुपये १००० कोटी अनुदान प्राप्त झाले आहे.

माहे जानेवारी, २०१५ पर्यंत रुपये १८२१.१२ कोटी इतकी रक्कम खर्च झाली आहे. खर्च झालेल्या रक्कमेपैकी रुपये ८२१.१२ कोटी बृहन्मुंबई महापालिकेने स्वत:च्या निधीतून खर्च केलेले आहे.

ब्रिमस्टोवॅड प्रकल्पातील एकूण ५८ कामांपैकी २६ कामे पूर्ण झाली असून २९ कामे प्रगतीपथावर आहेत व उर्वरीत ३ कामांची निविदा प्रक्रिया सुरु आहे.

सुधारीत विस्तृत प्रकल्प अहवालानुसार प्रकल्पाची एकूण किंमत रुपये ३९०० कोटी इतकी झाली आहे.

(३) भाग १ बाबत कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही. प्रश्न भाग ०२ च्या अनुषंगाने रक्कम रुपये ३९०० कोटीपैकी रुपये १२०० कोटी याआधीच केंद्र सरकारकडून मंजूर झाले असून, उर्वरीत रुपये २७०० कोटी इतक्या अतिरीक्त निधीची मागणी केंद्र शासनाकडे करण्यात आली आहे. त्याबाबतचा विस्तृत प्रकल्प अहवाल केंद्र शासनाकडे मंजूरीसाठी पाठविण्यात आला असून त्याअनुषंगाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई महानगरपालिकेने सोयी सुविधांवर निधी खर्च न केल्याबाबत**

**(२५) * ३४९२ श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेकडून तीन हजार कोटीचा अर्थसंकल्प मांडला जात असतांना प्रशासनाने तरतूद केलेल्या निधीपैकी ५० टक्केही रक्कम मुंबईतील सोयीसुविधांवर खर्च करीत नसल्याचे माहे डिसेंबर, २०१४ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, तद्नुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजाचे (बेस्ट उपक्रमाच्या अर्थसंकल्प वगळून) एकूण आकारमान रु.३११७८.१५ कोटी एवढे असून त्यापैकी भांडवली अर्थसंकल्पाचे आकारमान रु.११००३.६९ कोटी एवढे आहे. सन २०१४-१५ चे भांडवली अर्थसंकल्पाचे आकारमान रु. ७३४८.०८ कोटी इतके सुधारित करण्यात आले असून. दिनांक ३१.१.२०१५ पर्यंत रु.३१४६.८६ कोटी इतका प्रत्यक्ष खर्च झाला आहे. सन २०१४-१५ च्या आर्थिक वर्षात जानेवारी, २०१५ पर्यंत झालेल्या प्रत्यक्ष खर्चाची सुधारीत अंदाजाशी तुलना केल्यास ती ४२.८३ टक्के एवढी आहे.

(२) व (३) बृहन्मुंबई महापालिकेच्या अर्थसंकल्पात विविध मांडवली कामांसाठी मोठया प्रमाणावर तरतूदी करण्यात येतात. हे प्रकल्प पूर्ण होण्यासाठी एक वर्ष व कामांच्या स्वरुपानुसार एक व वर्षापेक्षा अधिक कालावधी देखील लागतो. प्रकल्प कामांच्या बाबतीत विशेषतः रस्ते, पर्जन्य जलवाहीन्या, पूल तसेच जल अभियंता खात्याशी संबंधीत मायक्रो टनेलींग कामे सुरु करण्यापूर्वी वन खाते, महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ऑथॉरिटी, रेल्वे, वाहतूक पोलीस इत्यादी विविध बाहय प्राधिकरणाच्या आवश्यक असलेल्या मंजू-या/ना-हरकत मिळविण्यास वेळ लागतो. त्यामुळे संबंधीत आर्थिक वर्षातील तरतुदींचा पूर्ण विनीयोग होऊ शकत नाही. काही प्रकल्प कामांच्या बाबतीत वापरायचे तंत्रज्ञान तांत्रिक सल्लागार समितीकडून अंतिम करुन घेणे आवश्यक असते. मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात तरतूद केलेली कामे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये पार पाडावयाची असतात. तसेच ही कामे दाट लोकवस्तीच्या भागात त्याचप्रमाणे खूप रहदारीच्या रस्त्यांवर आणि नाल्यांच्या काठावर झोपड्यांनी व्यापलेला ठिकाणी तसेच अतिक्रमणयुक्त ठिकाणी करावयाची असतात. त्यामुळे प्रत्यक्ष काम करताना महानगरपालिकेस अडचणी येतात.

-----------------

**लक्ष्मीनगर झोन अतंर्गत (उत्तर नागपूर) झिंगबाई टाकळी परिसरात ड्रेनेज पाईपलाईनच्या चेंबरमधून पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन टाकल्याबाबत**

**(२६) * ३९७२ श्री.राजेंद्र मुळक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लक्ष्मीनगर झोन अतंर्गत (उत्तर नागपूर) झिंगबाई टाकळी परिसरात ड्रेनेज पाईपलाईनच्या चेंबरमधून पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन टाकण्यात आली असून सदरहू पाईपलाईन फुटल्यास वा अन्य कारणांनी नागरीकांना दुषित पाण्याचा पुरवठा झाल्यास नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण होणार असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदरील ठिकाणावरून पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन वेगळी करण्याबाबत येथील ग्रामस्थांकडून संबंधित विभागाकडे मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) नागपूर महानगरपालिकेकडे ग्रामस्थांकडून पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन वेगळी करण्याबाबत मागणी आलेली नाही. मात्र महानगरपालिकेमार्फत पाणीपुरवठा करणा-या ओ.सी.डब्ल्यू.पी.एल. या सेवा पुरवठाद्वाराच्या प्रतिनिधीस जल वाहिनीस नागपूर सुधार प्रन्यासची सांडपाण्याचा निचरा होणारी वाहिनी छेदत असल्याचे निदर्शनास आले. सदर बाब नागपूर सुधार प्रन्यासच्याही निदर्शनास आणून देण्यात आली आहे.

तसेच सेवा पुरवठादारांकडे दुषित पाणीपुरवठ्याच्या ५ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या व त्यांचे निराकरण करण्यात आले आहे.

(३) नागपूर सुधार प्रन्यासने पाण्याची पाईपलाईन सुरक्षित ठेवून सांडपाण्याचा निचरा होणा-या वाहिनीची दिशा बदललेली आहे.

तथापी, जलवाहिनीजवळ सांडपाण्याचा निचरा होणा-या वाहिनीचे एक-दोन चेंबर्स आढळून आले आहेत. याबाबत नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने प्रस्तुत समस्येचे तात्काळ निराकरण करण्यात यावे असे नागपूर सुधार प्रन्यासला शासन स्तरावरुन कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रेवदंडा येथील (जि.रायगड) पोलीस ठाण्याचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक नागरीकांना व सामाजिक कार्यकर्त्यांना धमक्या व अपमानास्पद वागणूक देत असल्याबाबत**

**(२७) * ३६०२ श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील रेवदंडा येथील पोलीस ठाण्याचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.आबासाहेब पाटील यांच्याकडून तेथील नागरीकांना व सामाजिक कार्यकर्त्यांना धमक्या व अपमानास्पद वागणूक देण्यात येते अशी तक्रार तेथील सामाजिक कार्यकर्त्यांनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान तेथील पोलीस अधिक्षक, जिल्हाधिकारी, रायगड व कोकण विभागाचे पोलीस आयुक्त यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) रेवदंडा पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी सहाय्य पोलीस निरिक्षक, श्री.आबासाहेब पाटील यांच्याकडून नागरिकांना व सामाजिक कार्यकर्त्यांना धमक्या व अपमानाच्या वागणूक देत असल्याबाबतचा अर्जदार किशोर काजारे यांचा दिनांक २२.१२.२०१४ रोजीचा अर्ज पोलीस अधिक्षक, रायगड यांचे कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

(२) अर्जदारांच्या उपरोक्त अर्जाच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, अलिबाग विभाग, अलिबाग यांचे स्तरावर चौकशी चालू आहे.

-----------------

**ठाणे जिल्ह्यातील मिरा-भाईंदर महानगरपालिकेला डंपिंग ग्राऊंड व प्रक्रिया केंद्रासाठी राज्य शासनाने दिलेल्या जमिनीवरील अतिक्रमण हटविण्याबाबत**

**(२८) * ३००० श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मिरा-भाईंदर महानगरपालिकेला डंपिंग ग्राऊंड व प्रक्रिया केंद्रासाठी ७५ एकर जमीन राज्य शासनाने दिली आहे त्या ७५ एकर जमीनीवर २५ एकर जागेत अतिक्रमण असून हे अतिक्रमण हटविण्याबाबत महानगरपालिकेकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जागेत कच-याची साठवण केली जात असून त्यावर प्रक्रिया केली जात नसल्याने या भागात दुर्गंधी पसरून रोगराई निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत राज्य शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त दोन्ही विषयी कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही, या जागेवर कोणत्याही स्वरुपाचे अतिक्रमण झालेले नाही.
(२) उक्त जागेत साठवणूक केलेल्या कचऱ्यामुळे आजुबाजूच्या परिसरात दुर्गंधी पसरु नये म्हणून महानगरपालिकेमार्फत त्याठिकाणी वेळोवेळी माती पसरविण्यात येते.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सोलापूर महापालिकेमार्फत चालविण्यात आलेल्या रुग्णालयासाठी यंत्रसामुग्री पुरविणेबाबत**

**(२९) * ३७१० श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर महानगरपालिकेमार्फत मदत तेरेसा पॉलिक्लिनिक रुग्णालयात नेत्रचिकित्सा व शस्त्रक्रिया केली जाते मात्र यंत्रसामुग्रीअभावी सदर विभाग तीन वर्षापासून बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सोलापूर महापालिकेमार्फत चालविण्यात आलेल्या रुग्णालयासाठी यंत्रसामुग्री पुरविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) सद्या महापालिकेतून नियमित सेवेतील वैद्यकीय आधिकारी यांचेमार्फत डोळे तपासणी व त्यानुसार वैद्यकीय सल्ला देणे ही प्राथमिक स्वरुपावर कामे नियमित स्वरुपात चालू आहेत व रुग्णास नेत्र शस्त्रक्रीया करणेसाठी सक्षम व पात्र नेत्र चिकित्सक नियमित अथवा मानधनावर उपलब्ध झाल्यानंतर शस्त्रक्रियेसाठी लागणारे आवश्यक ते साहित्य उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था ठेवली आहे.

-----------------

**कल्याण-डोंबिवली मनपा हद्दीतील वाढत्या मोबाईल टॉवर्स बाबत**

**(३०) * २७२६ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोबिंवली मनपा हद्दीत एकूण किती मोबाईल टॉवर्स उभारण्यात आलेले आहेत,
(२) सदर मोबाईल टॉवर्सपैकी किती मोबाईल टॉवर्स अनधिकृत आहेत,
(३) दिवसेदिवस मोबाईल टॉवर्सची संख्या वाढीस लागल्याने कल्याण-डोबिंवली मनपा हद्दीतील नागरिकांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मोबाईल टॉवर्समुळे नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेल्या समस्यांबाबत परिणामकारकरित्या आळा घालण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीत एकूण ४०१ मोबाईल टॉवर्स उभारण्यात आले असून त्यापैकी २९८ मोबाईल टॉवर्स अनधिकृत आहेत.

(३) अशी बाब आढळून आलेली नाही.

(४) रिट याचिका क्र. २०४३/२०१४ या न्यायालयीन प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने मोबाईल टॉवर्स संदर्भात राज्य शासन व स्थानिक स्वराज्य संस्थाना दिलेल्या निर्देशांनुसार कारवाई करण्यात येत आहे.

-----------------

## मुंबई येथील इंदू मिलच्या जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक बांधण्याचा घेतलेल्या निर्णयाबाबत

**(३१) * ३८५८ श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक १९१४ ला दिनांक १० डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील इंदू मिलच्या जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक बांधण्याचा निर्णय शासनाने नुकताच घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बांधकामास विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय स्मारक बांधण्यास शासनाने किती निधी प्रस्तावित केलेला आहे व केंद्र शासनाकडून किती निधी नियोजित केलेला आहे,

(४) उक्त बांधकामास दिनांक १४ एप्रिल पूर्वी सुरूवात होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) ते (४) इंदू मिल क्र.६ येथील जागेवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारकाचे आरक्षण निर्माण करण्यासाठी बृहन्मुंबईच्या मंजूर विकास आराखडयामध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१ अे अे) अनवये फेरबदलाची वैधानिक कार्यवाही शासनाने सुरु केलेली असून त्याबाबत नागरिकांच्या सूचना/हरकती मागविणारी सूचना दिनांक ०१/१२/२०१२ रोजी निर्गमित करुन दिनांक ०३/१२/२०१२ रोजी शासकीय राजपत्रात प्रसिध्द केलेली आहे. सदर जमीन सीआरझेड मध्ये स्थित असल्याने प्रस्तावित स्मारकाचे आरक्षण अंतिमत: अधिसूचित करण्यापूर्वी सीआरझेड अधिसूचना-२०११ मध्ये केंद्र शासनाने त्याविषयी दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सी.आर.झेड अधिसूचनेत तशी

दुरुस्ती करण्यासंदर्भातील प्रस्ताव महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटीने शिफारशीसह नॅशनल कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथारिटीकडे सादर केलेला होता. नॅशनल कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटीने दिनांक १६/०७/२०१२ रोजीच्या बैठकीमध्ये त्यास मान्यता देवून तशी शिफारस केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयास केलेली आहे. यासंदर्भात सीआरझेड अधिसुचनेत आवश्यक ती सुधारणा केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाकडून होणार आहे.

केंद्रिय मंत्रीमंडळाने दिनांक २५/११/२०१३ रोजीच्या बैठकीमध्ये इंदू मिल क्र.६ ची जागा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेतला असून सदर निर्णय घेतांना काही मुद्यावर राज्य शासनाकडून हमीपत्र अपेक्षिले होते. त्यानुषंगाने दिनांक ०२/०७/२०१४ रोजीच्या राज्य मंत्रीमंडळाचे बैठकीत केंद्र शासनास अपेक्षित हमीपत्र सादर करणेस मंजूरी देणेत आली. त्यानुसार केंद्र शासनास सदर हमीपत्र दिनांक १७ नोव्हेंबर, २०१४ रोजीच्या पत्रान्वये राज्य शासनाकडून पाठविण्यात आले आहे. इंदू मिल क्र. ६ ची जागा सदर स्मारकासाठी उपलब्ध करुन देण्याकामी पुढील कार्यवाही केंद्र शासनाकडून होणार आहे.

प्रस्तावित स्मारकाच्या विकासासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे विशेष नियोजन प्राधिकरण असल्याने विकासाबाबत सर्व कार्यवाही प्राघिकरणाकडून होणार आहे. सद्य:स्थितीत या कामासाठी निधी कमतरतेचा मुद्दा नाही.

-----------------

## मुंबई पोर्ट ट्रस्टच्या पुनर्विकासाबाबत

**(३२) * २९७० श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय समितीच्या पुनर्विकास अहवालात मुंबई पोर्ट ट्रस्टच्या ४२१ हेक्टर जागेचा पायाभूत विकास करुन सुरळीत वाहतूक सुविधा आणि सुंदर सागरी किनारा तयार करण्याच्या नावाखाली देशातील या सर्वात महत्वाच्या बंदराचे भवितव्य धोक्यात आल्याची चर्चा सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीपीटीच्या पुनर्विकास अहवालाबाबत राज्य शासनाची भूमिका काय आहे,

(३) तसेच, बीपीटीच्या पुनर्विकासाबाबत राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) मुंबई पोर्ट ट्रस्ट हे विश्वस्त मंडळ केंद्र शासनाच्या अखत्यारीत आहे.

-----------------

**सवड (ता.रिसोड, जि वाशिम) येथील दोन अल्पवयीन मुलींना पळवून नेल्याच्या घटनेबाबत**

**(३३) * २९३४ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सवड (ता.रिसोड, जि वाशिम) येथील दोन अल्पवयीन मुलींना पळवून नेल्याची घटना दिनांक १४ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास घडली असून दोनही मुलीचे संशयास्पद मृत्यू झाल्याचे दिनांक १६ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली काय, तसेच चौकशीत काय आढळून आले व दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन रिसोड येथे गुन्हा रजि.क्र.१३/२०१५, भा.दं.वि.कलम ३६३, ३६६अ, ३०५ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून सदर गुन्ह्यातील आरोपीस दि.१५ जानेवारी, २०१५ रोजी अटक करण्यात आली असून आरोपीस सध्या न्यायालयीन कोठडी देण्यात आली असून गुन्ह्याचा तपास चालू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बोळींज विरार येथील म्हाडाला प्राप्त झालेल्या ४७ हेक्टर जमिनींपैकी सुमारे २२ हेक्टर जमिनीवर विकास आराखड्यामध्ये विविध आरक्षणे टाकण्यात आल्याबाबत**

**(३४) * ३१०४ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाच्या विरार बोळींज येथील शासनाने महानगरपालिकेच्या ताब्यात दिलेल्या तसेच म्हाडाच्या लेआऊट मधील महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केलेला बगिचा १२ मी रुंदीचा डी.पी.रस्ता व ई.पी. १८ नुसार मंजूर केलेल्या क्षेत्रातील ६३२७ चौ.मी.जागा हरितपट्टयाकरिता सोडून स्मशानभूमीचे आरक्षण प्रस्तावित करण्यात आल्यामुळे म्हाडाच्या योजनेवर अन्याय झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विरार येथील म्हाडाला प्राप्त झालेल्या ४७ हेक्टर जमिनींपैकी सुमारे २२ हेक्टर जमिनीवर विकास आराखड्यामध्ये विविध आरक्षणे टाकण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, म्हाडाने सदरहू आरक्षणांवर बांधलेल्या घर योजनेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) महानगरपालिकेने दफनभूमीकरीताचे आरक्षण प्रस्तावित करण्यासाठी कलम ३७ नुसारची कार्यवाही सुरु केली आहे.
(२) म्हाडाला गृहनिर्माण करिता प्राप्त ४७ हेक्टर जमिनीपैकी २०.२५ हेक्टर जमिनीवर विकास योजनेमध्ये विविध आरक्षणे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत.
(३) वसई-विरार शहर महानगरपालिकेने मंजुर विकास योजना व मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार म्हाडाला विकास परवानगी दिलेली आहे. तसेच प्रस्तावित दफनभूमीपासून ३० मीटरचा हरितपट्टा दर्शवून म्हाडा ने सुधारित बांधकाम परवानगी प्रस्ताव महानगरपालिकेकडे सादर केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खोपोली मध्ये (जि.रायगड) कावीळ, मलेरिया व टायफॉईडच्या साथींवर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत

**(३५) * ४०९४ श्री.राहुल नार्वेकर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खापोली (जि.रायगड) मध्ये कावीळ, मलेरिया व टायफॉईड या साथीच्या रोगांचे जवळपास २०० रुग्ण पालिकेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात दाखल करण्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्याच आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने सदर साथीच्या रोगांना प्रतिबंध घालण्यासाठी आरोग्यविभागाकडून कोणती तातडीची उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: हे खरे आहे. खोपोली (जि.रायगड) मध्ये जानेवारी, २०१५ च्या आठवडयामध्ये फक्त कावीळ सदृश रुग्ण आढळून आलेले आहेत.
(२) व (३) सदर प्रकरणी खोपोली नगरपरिषदेमार्फत प्रतिबंधात्मक उपाययोजना त्वरीत करण्यात आलेली असून बाधीत लोकांना नगरपरिषदेमार्फत मोफत उपचार देण्यात आले आहेत. याशिवाय खोपोली नगरपरिषदेमध्ये याकरीता स्वतंत्र कक्ष स्थापन केले असून सद्य:स्थितीत नविन कोणतेही रुग्ण आढळून आलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्य गुन्हे अन्वेषण विभागात येणा-या हस्ताक्षर विभागापासुन छायाचित्रण विभाग वेगळा करण्याबाबत**

**(३६) * २७७१ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य गुन्हे अन्वेषण विभागात येणा-या हस्ताक्षर व छायाचित्रण विभागातील छायाचित्रण विभागावर होत असलेल्या अन्यायाबाबत शहानिशा होऊन हा विभाग हस्ताक्षर या विभागातून स्वतंत्र होऊन, शैक्षणिक पात्रता वाढ, सेवा प्रवेश नियम बदल, वेतनवाढ, पदाचे नामाभिधानात बदल होऊन या विभागाचे वेगळे अस्तित्व निर्माण होवून या विभागाची पूनर्रचना होण्यासाठी नागपूर विभागाच्या जनप्रतिनीधिंनी दिनांक १३ नोव्हेंबर, २०१४, १८ डिसेंबर, २०१४, २१ डिसेंबर, २०१४, १ जानेवारी, २०१५, १० जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री तथा गृहमंत्री तसेच गृह राज्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना पत्र पाठवून राज्य गुन्हे अन्वेषण विभागात येणा-या हस्ताक्षर व छायाचित्रण विभागावर होत असलेल्या अन्यायाची दखल घेऊन विभागाची पुनर्रचना करण्याची विनंती केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, छायाचित्रण विभागात संपूर्ण राज्यात फक्त २२ कर्मचारीच कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास या, विषयी शासनाची भूमिका काय आहे,

(४) असल्यास, त्यांच्यावर झालेल्या अन्याय दूर करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

सदर निवेदनावर कार्यवाही करण्यासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे सविस्तर अभिप्राय मागविण्यात आले आहेत. तसेच, सदर विभागातील हस्ताक्षरतज्ञांच्या वेतनश्रेणीमधील तफावती संदर्भातील प्रस्तावावर कार्यवाही चालू आहे.

(२) हस्तांक्षर व छायाचित्रण विभागात सध्या २१ छायाचित्रण कर्मचारी कार्यरत आहेत. याशिवाय, या विभागात आणखी २० दस्तऐवज परिक्षकही कार्यरत आहेत. मात्र, अलीकडच्या अद्यावत छायाचित्रण कार्यप्रणालीमुळे छायाचित्रणाचे कार्य पूर्वीपेक्षा फारच सुटसुटीत व सोईस्कर झाल्यामुळे सध्या छायाचित्रण विभागात एकही प्रकरण प्रलंबित नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे शहरातील कोलशेत भागात वाघवा ग्रुप कन्स्ट्रक्शनच्या एव्हरेस्ट इमारतीचे बांधकाम सुरू असतांना माल वाहून नेणारी ट्रॉली कोसळून झालेला अपघात**

**(३७) * ३०६७ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील कोलशेत भागात वाघवा ग्रुप कन्स्ट्रक्शनच्या एव्हरेस्ट इमारतीचे बांधकाम सुरू असतांना माल वाहून नेणारी ट्रॉली कोसळून झालेल्या अपघातात एका कामगाराचा जागीच मृत्यू व पाच जण जखमी झाल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत्त आहे,

(३) असल्यास, या घटनेत मृत्यू पावलेल्या कामगारांच्या कुटूंबियांना व जखमींना कोणत्या प्रकारची आर्थिक मदत वा नुकसान भरपाई दिली आहे,

(४) अद्यापही आर्थिक मदत वा नुकसान भरपाई दिली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

प्रकरणी दिनांक ५.०१.२०१५ रोजी सदर घटना घडल्यानंतर प्रथम कापुरबावडी पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. ०६/२०१५ भादंवि कलम ३०४ (अ) ३३६, ३३८, २८७, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करुन जबाबदार असलेल्या दोषी इसमांना तात्काळ अटक करुन न्यायालयात हजर केले आहे. न्यायालयाने त्यांना जामिनावर सोडले आहे.

गुन्ह्याचा अधिक तपास चालु आहे.

(३) व (४) सदर घटनेत मृत्यू पावलेला इसम याचा मुळ गावचा व वारसांचा तपास करणे कामी पोलीस पथक मयत इसम यांचे मुळगांव खालियाबाद, पोस्ट रामनगर, ता.जि.जौनपुर राज्य उत्तरप्रदेश येथे गेले असता सदर ठिकाणी मयताचा व त्याचे वारसाचा कोणताही ठावठिकाणा मिळून आला नाही. तसेच सदरचे जखमी इसम यांचेवर दवाउपचार केलेला आहे. जखमी इसम हे परप्रांतिय असुन ते प्राथमिक दवाउपचार करुन त्यांचे मुळगावी अथवा इतरत्र निघुन गेलेले आहेत असे आज पावेतो तपासात निष्पन्न झाले आहे.

-----------------

**मौजे आर्णी (जि.यवतमाळ) प्रभाग क्रमांक २ येथील कुटुंबांना सोयी सुविधा प्राप्त करुन देण्याबाबत**

**(३८) * ३८९३ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आर्णी (जि.यवतमाळ) प्रभाग क्रमांक २ येथे सुमारे ५० कुटुंबे ४० वर्षापासून वास्तव्यास असून त्याचे नावावर लाईट बील, पाणी बील. शिधापत्रिका आदि राहिवाशी इत्यादीपैकी कोणताही पुरावा सदर कुटुंबांकडे नसल्याने शासनामार्फत राबविण्यात येणा-या योजनेतील सोयी सुविधांचा लाभ त्यांना घेता येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर कुटुंबांना सोयीसुविधांचा लाभ देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही. हे खरे नाही.

आर्णि जि.यवतमाळ नगर परिषदेची निर्मिती दि.१६/८ /२०११ ला झालेली असून सध्या नगर परिषद क्षेत्रात ४ प्रभाग आहेत. नगर परिषदेमध्ये सध्या अस्तित्वात असलेल्या प्रभागात शासनाकडून प्राप्त होणारे अनुदान उदा. नागरी दलित वस्ती योजना, रस्ता अनुदान, जिल्हा नगरोत्थान, १३ वा वित्त आयोग, विशेष निधी व इतर शासकीय अनुदानातून जनतेला सोयी सुविधा पुरविण्यात येत आहेत.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कल्याण-डोंबिवली मनपाच्या नगररचना विभागातील अनागोंदी कारभाराबाबत**

**(३९) * ३३१९ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.प्रकाश गजभिये, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीत गत सहा-सात वर्षात विकासकाना बांधकाम परवानगी देताना महानगरपालिकेच्या नगर रचना विभागाने नियमांचे उल्लंघन करून परवानगी दिल्याने याभागात मोठ्या प्रमाणात अनधिकृत व निकृष्ट दर्जाच्या इमारती उभारल्याने त्या अल्पावधीतच कोसळून मोठे अपघात होवून जीवित हानी होत असल्याचे माहे, जानेवारी २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेच्या नगररचना विभागातील अधिकाऱ्यांनी नियमांचे उल्लंघन करून बांधकाम विकासकांना परवानगी दिल्या प्रकरणी शासनाकडे तक्रारी प्राप्त झाल्यानंतर उपसंचालक श्री.सुधीर नांगानुरे समितीतर्फे चौकशी करण्यात आली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू नांगानुरे समितीने अहवालात २७ महापालिका अधिका-यांना दोषी ठरविले असून, त्यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच, कल्याण-डोंबिवली महापालिका हद्दीत येणाऱ्या किती इमारती अनधिकृत आहेत व त्या निश्काषित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप, याबाबत कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) नांगनुरे समितीने एकूण २७ अधिकारी/कर्मचारी दोषी ठरविले आहेत. यापैकी २२ अधिकारी/कर्मचारी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे असून महानगरपालिकेकडून त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे. तर उर्वरित राज्य शासनाच्या सेवेतील ५ अधिकाऱ्यांविरुध्द शासनाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात एकूण ८५४६३ अनधिकृत बांधकामे झाल्याचे निदर्शनास आले आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून पालिका क्षेत्रातील एकूण १२५७३ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) तालुक्यामध्ये नरबळी दिल्याची घटना**

**(४०) * ३३४२ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) तालुक्यातील टाके हर्ष या गावाजवळील एका मांत्रिक महिलेच्या सांगण्यावरुन भुताटकी घालविण्यासाठी दांडवळ येथील काशीनाथ दोरे व गोविंद दोरे या दोन सख्या भावांनी आपल्या आई व मावशीचा नरबळी दिल्याची घटना दिनांक ३० डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात अंधश्रध्दा असून त्यापोटी अनेक जणांना आपले प्राण नाहक गमवावे लागत असतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग-१ मधील आरोपींवर कोणती कारवाई केली तसेच आदिवासी पाड्यांवर अंधश्रध्दापोटी नाहक बळी रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, प्रश्न भाग-१ व २ बाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) प्रश्नात नमूद प्रकरणी घोटी पोलीस स्टेशन जि.नाशिक येथे ११ आरोपींविरुध्द दि. ३०/१२/२०१४ रोजी गु.र.नं. १६०/२०१४ भा.द.वि. कलम ३०२, ३०७, २०१, ३४ सह महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक कायदा २०१३ चे कलम ३(२) नुसार गुन्हा दाखल आहे.

(२) नाही, नाशिक जिल्हा ग्रामीण मध्ये अंधश्रध्देबाबतचे एकच प्रकरण घडले असून या व्यतिरिक्त गुन्हे दाखल नाहीत.

(३) उक्त नमूद गुन्ह्यात ११ आरोपींना अटक करण्यात आली असून ते सद्य: न्यायालयीन कोठडीत आहेत.

अंधश्रध्दा निर्मुलन कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे कामी नाशिक ग्रामीण जिल्ह्यातील या कायद्याविषयी पोलीस ठाणे स्तरावर विविध माध्यमांद्वारे जनमानसात मध्ये जनजागृती करुन जनतेमध्ये पोलीस व शासनाविषयीचा विश्वास वाढत आहे व जनतेमध्ये अंधश्रध्दा बाबत जनजागृती करुन आपले गावात व परिसरात अंधश्रध्दा न पाळणे, अंधश्रध्दा विरोधात जनजागृती केली जात आहे. तसेच सदर बाबत काही प्रकार घडून आल्यास पिडीतांना निर्भिडपणे तक्रार द्यावी बाबत देखील जनजागृती केली आहे.
(४) विलंब झालेला नाही.

-----------------

**पुणे येथे अनधिकृत फ्लेक्ससंदर्भातील पुणे मनपाने उच्च न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रातील काही मुद्दे दिशाभूल करणारे असल्याबाबत**

**(४१) * ३१६१ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथे अनधिकृत फ्लेक्ससंदर्भातील उपाययोजना आणि प्रभागनिहाय नागरिकांना समितीबाबत पुणे मनपाने उच्च न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रातील काही मुद्दे दिशाभूल करणारे असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासन त्वरीत चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुणे महानगरपालिकेने मा.उच्च न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात दिशाभूल करणारे मुद्दे असल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई महानगरपालिकेत कच-यांवर प्रक्रिया करणारे प्रकल्प बंद असल्याबाबत**

**(४२) * ३१३० श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेत कच-यांवर प्रक्रिया करणारे प्रकल्प बंद आहेत तसेच मुंबई शहरामध्ये निर्माण होणारा कचरा मोठ्या प्रमाणात खाडी व व समुद्रात टाकला जात असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहरातील कच-यांवर प्रक्रिया करणारे प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी शासनाने काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच खाडी व समुद्रात कचरा टाकणा-या संबधितांवर व कंत्राटदारावर कोणत्या स्वरूपाची कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप प्रश्न भाग २ व ३ बाबत शासनाने कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही. बृहन्मुंबई महानगरपालिकेने कच-यावर प्रक्रिया करणारे प्रकल्प देवनार व मुलुंड क्षेपणभूमी व कांजुर भरावभूमी येथे सार्वजनिक खाजगी सहभाग (PPP) तत्वावर हाती घेतले आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात बलात्काराच्या घटनांमध्ये झालेली वाढ**

**(४३) * ३२२७ श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात बलात्काराच्या घटनांमध्ये तब्बल ६३ टक्क्यांनी वाढ झाली असून त्यात १० वर्षापर्यंतच्या १६१ मुलींचा समावेश असल्याची माहिती निदर्शनास आली असल्याचे माहे, जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील बलात्कार हे परिचितांकडूनच होत असल्याचे भीषण वास्तव राज्य गुन्हे अन्वेषण (सीआयडी) विभागाच्या अहवालातूनच निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, राज्यात बलात्कार व महिलांवरील होणारे अत्याचार रोखण्याबाबत शासन कोणती कार्यवाही वा उपाययोजना करणार आहे,
(५) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सन २०१२ च्या तुलनेत सन २०१३ मध्ये बलात्कारांच्या गुन्ह्यामध्ये ६३.२६ टक्के वाढ झाली. तथापि, सन २०१३ च्या तुलनेत २०१४ मध्ये ही वाढ ७.५१टक्के एवढी आहे. सन २०१३ मध्ये झालेल्या एकूण बलात्काराच्या पिडितामध्ये १० वर्षापर्यंतच्या मुलींची संख्या १६१ ही आहे.
(२) प्राप्त आकडेवारीनुसार सन २०१२ मध्ये ९५.५६ टक्के व सन २०१३ मध्ये ९३.४३ टक्के बलात्कार हे परिचितांकडून झाल्याची बाब निदर्शनास आली आहे.
(३) व (४) राज्यात बलात्कार व महिलांवरील होणारे अत्याचार रोखण्याबाबत शासनाने खालीलप्रमाणे उपाययोजना केलेल्या आहेत.

राज्यात महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी महिला अत्याचार प्रतिबंध कक्षाची स्थापना करण्यात आली असून विशेष पोलीस महानिरीक्षक दर्जाचे अधिकारी हे या कक्षाचे प्रमुख आहेत. पोलीस आयुक्त, बन्हमुंबई यांचे कार्यक्षेत्रात महिला अत्याचार प्रतिबंधक कक्ष स्थापन करण्यात आला असून, सर्व पोलीस स्टेशनमध्ये महिला सहाय कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. तसेच, सर्व आयुक्तालये व जिल्ह्यांमध्ये घटक प्रमुखांच्या नियंत्रणाखाली मुख्यलयाच्या ठिकाणी महिला सहाय्य कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. जिल्हा / आयुक्तालय पातळीवर तसेच पोलीस स्टेशन पातळीवर महिला सुरक्षा समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत जिल्हा / आयुक्तालय पातळीवरची समिती जिल्हा पोलीस अधीक्षक / पोलीस आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत असून समितीत महिला डॉक्टर्स, महिला वकील, प्राध्यापिका तसेच सामाजिक कार्यकर्त्या वगैरेंचा समावेश करण्यात आलेला आहे. त्याचप्रकारे पोलीस स्टेशन पातळीवर देखील समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. महिलांवरील अत्याचार व बलात्काराची प्रकरणे निकाली काढण्यासाठी विशेष न्यायालयांची स्थापना करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे राज्यात नव्याने जलदगती न्यायालये उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच संकटात सापडलेल्या महिलांच्या मदतीकरिता टोल फ्रि हेल्पलाईन क्रमांक "१०३" मुंबई, ठाणे व नवी मुंबई या जिल्ह्यांकरिता व उर्वरित जिल्ह्यांकरिता "१०९१" सुरु करण्यात आले आहेत. तसेच राज्यात बलात्कार, बालकांवरील लैंगिक अत्याचार व ॲसिड हल्ला यामध्ये बळी पडलेल्या महिला आणि बालकांना अर्थसहाय पुरविण्यासाठी व पुनर्वसन करण्यासाठी "मनोधैर्य" योजना राबविण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड महापालिकेच्या अबचलनगर या प्रभागातील नागरिकांची पाण्याची तसेच सांडपाण्याची असलेली समस्या

**(४४) * ४३९३ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड महापालिकेचा प्रभाव २३ हा अबचलनगर प्रभाग म्हणून ओळखला जात असुन गुरुत्ता गद्दी सोहळा च्याकाळात या भागाचा वेगाने विकास झाला, मात्र ड्रेनेजलाईन आणि पाणीपुरवठ्याची समस्या कायम असुन या परिसरात उच्च दाबाने पाणीपुरवठा होत नसल्याने पाण्याची तसेच ड्रेनेजलाईन मुख्य लाईनला जोडली नसल्याने सांडपाण्याची समस्या निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कारणास्तव नागरिकांची होणारी गैरसोय दूर करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) गुरु-ता-गद्दी सोहळा दरम्यान सन २००८ मध्ये गुरुद्वारा परिसराच्या विकास कामाच्यावेळी बाधीत घरांसाठी पुनर्वसीत झालेल्या अबचलनगर भागात या योजने अंतर्गत पाणीपुरवठा व मलवाहिनी करण्यात आल्या आहेत. पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेद्वारे पाणीपुरवठा नियमित आहे.

मलवाहिन्या संपूर्ण भागात टाकलेल्या असून त्या भागात सेप्टीक टँक बांधलेला असून त्यास सर्व मलवाहिन्या जोडलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये (ट्रबल सबप्लान) येणाऱ्या १० नगरपालिकांना विविध योजनेसाठी लागणारी लोकवर्गणीची अट शिथील करण्याबाबत**

**(४५) * ४४७५ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी उपयोजना क्षेत्रात (ट्रबल सबप्लान) येणाऱ्या १० नगरपालिकांना विविध योजनेसाठी लागणारी लोक वर्गणीची अट शिथील करावी अशी मागणी लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीनुसार शासनाने उपरोक्त १० नगरपालिकांना विविध योजनेसाठी लागणारी लोक वर्गणीची अट शिथील करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) असे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(२) या विभागातून आदिवासी उपयोजनेखाली नागरी आदिवासी वस्ती सुधार योजना राबविली जाते. सदर योजनेच्या मार्गदर्शक तत्वामध्ये लोकवर्गणीची अट अंतर्भूत नाही. त्यामुळे सदरहू अट शिथिल करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद शहरात अनधिकृत बांधकामाकडे महानगरपालिकेचे होत असलेले दुर्लक्ष**

**(४६) * ५४४५ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहराच्या चारही बाजुनी मोठया प्रमाणात अनधिकृत बांधकाम होत असतांनाही महानगरपालिकेचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार बेकायदा अनधिकृत बांधकाम करणाऱ्या व बेकायदा अनधिकृत बांधकामाकडे दुर्लक्ष करणाऱ्या महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) व (३) अनधिकृत बांधकामधारकांना मुंबई प्रांतिक अधिनियम, १९४९ चे कलम २६० व ४७८ अन्वये नोटीस देण्यात येवून अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याची कार्यवाही औरंगाबाद महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यभरातील नगर परिषद सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना थकीत रक्कम देण्याबाबत**

**(४७) * २९०६ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यभरातील नगर परिषद सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्तीनंतर दिल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या आर्थिक लाभापोटी १८७.९ कोटी रुपये शासनाकडे थकित असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रक्कम शासनाकडे थकीत राहण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना थकीत रक्कम तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) राज्यातील नगरपरिषदांमधील सेवा निवृत्त कर्मचा-यांना सेवानिवृत्ती नंतरचे आर्थिक लाभ विहीत मुदतीत अदा करण्याची सर्वस्वी जबाबदारी नगरपरिषदेची आहे.

या संदर्भात आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालयाने दि.१८.१०.२०१४ च्या पत्रान्वये सर्व नगरपरिषदांना उत्पन्नाचे साधनांमध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने सर्व आवश्यक कारवाई करावी व आस्थापना खर्चात काटकसर करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील शाळा, महाविद्यालयांच्या सुरक्षेबाबत**

**(४८) * ४०७३ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अनिल भोसले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाकिस्तानमधील पेशावर येथील आर्मी स्कूलवर डिसेंबर, २०१४ मध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर मुंबई पोलीसांनी शहरातील शाळा महाविद्यालयांना सुरक्षेचे सुधारित नियम सुचविले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २६ जानेवारी, २०१५ नंतर पोलीसांमार्फत उक्त सूचनांच्या अमंलबजावणीबाबत आढावा घेतला जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) व (२) नुसार शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सुधारित नियमांची अमंलबजावणी न करणाऱ्या शाळा व महाविद्यालयांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) तसेच, मुंबईतील शाळा, महाविद्यालामध्ये सुरक्षा पुरविण्याबाबत शासनाने कोणती उपाय योजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४), (५) व (६) मुंबईतील शाळा व महाविद्यालयांना दिलेल्या सुरक्षिततेच्या सुधारीत सूचनांच्या अंमलबजावणीबाबत पोलीस ठाणे स्तरावर आढावा सुरू आहे.

----------------

**उल्हासनगर महानगरपालिका उप आयुक्त यांच्या दालनात एका लाचखोर लिपिकास बांधकाम परवाना देण्यासाठी लाचलुचपत विभागाने लाच घेतांना रंगेहाथ पकडल्याबाबत**

**(४९) * ३२४८ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर महानगरपालिका उप आयुक्त यांच्या दालनात एका लाचखोर लिपिकास बांधकाम परवाना देण्यासाठी लाचलुचपत विभागाने लाच घेताना पकडल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधीत कर्मचारी व अधिकारी यांचेवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, गेल्या २ वर्षात उल्हासनगर महानगरपालिकेच्या किती अधिकारी व कर्मचारी यांना लाचखोरीच्या कारणास्तव पकडण्यात आले आहे व अशा अधिका-यांची नावे काय आहेत,

(४) त्यांचेवर कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

लोकसेवक श्री. अंकूश काशिनाथ कदम, लिपीक, उल्हासनगर महानगरपालिका यांनी फिर्यादी श्री.अर्जुन रामरख्यानी यांच्याकडून बांधकाम मंजूरीच्या दोन फाईल क्लीअर करुन देण्यासाठी प्रत्येकी रु. २०,०००/- एवढया लाचेची मागणी करुन स्विकारल्याने, त्यांच्याविरुध्द गुन्हा रजिस्टर क्रमांक ०६/२०१४, लाचलुचपत प्रतिबंधक कायदा, १९८८ चे कलम ७, १३(१) (ड) सह १३ (२) अन्वये दि.१८.०१.२०१५ रोजी दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने आरोपीस दि.१८.०१.२०१५ रोजी अटक करण्यात आली होती. आरोपीस मा.न्यायालयाने दि.२१.०१.२०१५ पर्यंत पोलीस कोठडी मंजूर करुन त्यानंतर जामीनावर मुक्तता केली आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(३) व (४) ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांच्याकडून मागील दोन वर्षात उल्हासनगर महानगरपालिकेतील २ अधिकारी व ८ कर्मचारी यांच्यावर लाचेच्या मागणी प्रकरणी कारवाई करण्यात आली आहे. त्यापैकी एका कर्मचाऱ्यांबाबत (श्री.कदम, लिपीक) केलेल्या कारवाईचा तपशील वर नमूद केला आहे. उर्वरीत २ अधिकारी व ७ कर्मचारी यांचेबाबत केलेल्या कारवाईचा प्रकरण निहाय तपशील खालीलप्रमाणे आहे.

I) तक्रारादार श्री.मनोज ठाकूर, बांधकाम ठेकेदार यांच्याकडून अनधिकृत बांधकामावर कारवाई न करण्यासाठी रु.७५,०००/- एवढया लाचेची मागणी करुन आरोपी लोकसेवक श्री.रिझवान शेमले, मुकादम याने रु.५०,०००/- व श्री.गणेश शिंपी, स्वीय सहायक याने रु.२५,०००/- एवढी रक्कम दि.०७.०५.२०१३ रोजी स्विकारली असता, त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. सदर गुन्ह्यात दोन्ही आरोपी लोकसेवकांविरुध्द विठ्ठलवाडी पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.१५/२०१३ लाचलुचपत प्रतिबंधक कायदा, १९८८ चे कलम ७, १२, १३ (१) (ड) सह १३ (२) प्रमाणे दि.०८.०५.२०१३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी लोकसेवकांना दि. ०८.०५.२०१३ रोजी अटक करण्यात आली होती. सदर प्रकरणी दोन्ही आरोपी लोकसेवकांविरुध्द दि.०५.०४.२०१४ रोजी मा.विशेष न्यायालय, ठाणे येथे दोषारोप पत्र दाखल करण्यात आले असून त्याचा विशेष खटला क्रमांक १२/२०१४ असा आहे. सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

II) आरोपी लोकसेवक श्री.राजु बुलानी, लिपीक यांनी फिर्यादी सोनू पंजाबी यांच्याकडून बांधकाम न तोडणेसाठी रु.२०,०००/- लाचेची मागणी करुन ती दि.०१.०१.२०१४ रोजी स्विकारली असता, त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. सदर लाचेच्या सापळा प्रकरणी त्यांच्याविरुध्द मध्यवर्ती पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.०१/२०१४, लाचलुचपत प्रतिबंधक कायदा, १९८८ चे कलम ७, १३ (१) (ड) सह १३(२) प्रमाणे दि.०१.०१.२०१४ रोजी गुन्हा दाखल करण्यात येवून, त्यांना त्याच दिवशी सदर गुन्ह्यात अटक करण्यात आली होती. आरोपी लोकसेवक श्री.बुलानी यांच्याविरुध्द दि. ०४.०९.२०१४ रोजी मा.विशेष न्यायालय, कल्याण येथे दोषारोपत्र दाखल केले असून त्याचा विशेष खटला क्र. १९/२०१४ असा आहे. सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

III) आरोपी लोकसेवक श्री.मनोज ताराणी, नगररचनाकार व श्री.संजय पवार, कनिष्ठ अभियंता यांनी तक्रारदार श्री.शरद तिवारी यांचेकडे भोगवटा प्रमाणपत्रावर सही करण्यासाठी रु.५०,०००/- एवढया लाचेची मागणी करुन श्री.पवार, कनिष्ठ लिपीक याने स्वत:साठी व श्री.ताराणी, नगररचनाकार यांचेकरीता दि. ०६.०३.२०१४ रोजी स्विकारली असता, त्यांना रंगेहाथ

पकडण्यात आले. सदर लाचेच्या सापळा प्रकरणी दोन्ही आरोपी लोकसेवकांविरुध्द विठ्ठलवाडी पोलीस स्टेशन येथे गु.रा.क्र.४/२०१४, लाचलुचपत प्रतिबंधक कायदा, १९८८ चे कलम ७, १२, १३ (१) (ड) सह १३(२) प्रमाणे दि. ०७.०३.२०१४ रोजी गुन्हा दाखल करण्यात येवून, त्यांना त्याच दिवशी सदर गुन्ह्यात अटक करण्यात आली होती. या प्रकरणी दोन्ही आरोपी लोकसेवकांविरुध्द मा.न्यायालयात दोषारोप पत्र मंजूरीसाठी त्यांचे सक्षम प्राधिकारी यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

IV) आरोपी लोकसेवक श्री.दिपक चिमणकारे, प्रभारी सहाय्यक आयुक्त व श्री.परशुराम गायकवाड, जकात निरीक्षक यांनी तक्रारदार श्री.अनिल हर्चवानी यांचेकडून त्यांचेवर एलबीटीची कारवाई न करण्यासाठी रु. १,००,०००/- एवढया लाचेची मागणी करुन श्री.चिमणकारे, प्रभारी सहाय्यक आयुक्त यांनी दि. ०४.०९.२०१४ रोजी स्विकारली असता, त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. सदर लाचेच्या सापळा प्रकरणी दोन्ही आरोपी लोकसेवकांविरुध्द मध्यवर्ती पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ५२/२०१४, लाचलुचपत प्रतिबंधक कायदा, १९८८ चे कलम ७, १३ (१) (ड) सह १३ (२) प्रमाणे दि. ०५.०९.२०१४ रोजी गुन्हा दाखल करण्यात येवून, त्यांना त्याच दिवशी सदर गुन्ह्यात अटक करण्यात आली होती. या प्रकरणी दोन्ही आरोपी लोकसेवकांविरुध्द मा.न्यायालयात दोषारोप पत्र मंजूरीसाठी त्यांचे सक्षम प्राधिकारी यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

V) आरोपी लोकसेवक श्री.रतन केदार, लिपीक, अतिरिक्त कार्यभार सहाय्यक आयुकत व श्री.राजु छंगानी, मुकादम यांनी तक्रारदार श्री.नरेश बजाज यांच्याकडून घराचे बांधकाम न तोडण्यासाठी लाचेची मागणी करुन श्री.केदार यांनी रु. ५०,०००/- व श्री.छंगानी यांनी रु.२०००/- इतकी रक्कम दि. ३०.१२.२०१४ रोजी स्विकारली असता, त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. सदर लाचेच्या सापळा प्रकरणी दोन्ही आरोपी लोकसेवकांविरुध्द विठ्ठलवाडी पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. २९/२०१४, लाचलुचपत प्रतिबंधक कायदा, १९८८ चे कलम ७, १२, १३ (१) (ड) सह १३ (२) प्रमाणे दि. ३१.१२.२०१४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. दोन्ही आरोपींना दि. ३१.१२.२०१४ रोजी अटक करण्यात आली होती. दोन्ही आरोपी लोकसेवकांना मा. न्यायालयाने दि. ०२.०१.२०१५ पर्यंत पोलीस कोठडी मंजूर केली वा त्यानंतर न्यायालयीन कोठडी मंजूर करुन त्यांची जामीनावर मुक्तता केली आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

-----------------

## ठाणे येथे कॅन्सर हॉस्पिटलची उभारणी करणेबाबत

**(५०) * ३५४२ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेने ठाणे येथील मॉडेला मिलच्या जागेवर कर्करोग रुग्णांसाठी कॅन्सर हॉस्पिटल बांधण्याचा निर्णय दिनांक २६ जून, २०१४ रोजी वा त्या सुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याबाबत मुंबईतील ख्यातनाम टाटा मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटलचे संबंधित अधिकारी यांनी सदर जागेची माहे जून, २०१४ मध्ये पाहणी केल्यानंतर त्यांचेशी सल्लामसलत करून ठाणे महानगरपालिकेने सदर निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) इतकेच नव्हेतर कॅन्सर हॉस्पिटल न झाल्यास, त्या जागेवर शहरातील स्मशानभुमींची कमतरता विचारात घेऊन तेथे स्मशानभूमी उभारण्याचा त्याचवेळी पर्यायी निर्णय देखील ठाणे महानगरपालिकेने त्याचवेळी (माहे जून, २०१४) घेतला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर जागेवर कॅन्सर हॉस्पिटल वा स्मशानभूमी न उभारता त्याऐवजी आवश्यकता नसताना नाट्यगृह उभारण्याचा ठाणे महानगरपालिकेच्या सत्ताधारी राजकीय पक्षनेत्यांनी भूमिका घेतल्याचे दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्ते, स्थानिक लोकप्रतिनिधी व सर्वसामान्य जनतेने सदर नाट्यगृह उभारणीस विरोध करून, त्या जागेवर कॅन्सर हॉस्पिटल उभारण्यात यावे अशा आग्रही मागणीचे निवेदने तत्कालिन मा.आयुक्त, ठाणे मनपा, मा.महापौर, ठाणे मनपा व तत्कालिन प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय यांना माहे नोव्हेंबर, २०१४ व जानेवारी, २०१५ मध्ये सादर केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर निवेदनाधिन मागणी संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

तथापि, ठाणे येथील मौजे पाचपाखाडी क्षेत्रातील सेक्टर क्र.३ मधील मॉडेला मिलच्या विस्तीर्ण जागेवर कर्करुग्णांसाठी कॅन्सर हॉस्पिटल, स्मशानभूमी, पार्कीगसह नाट्यगृह व सांस्कृतिक सभागृह अशा विविध प्रकारे संबंधीत जागेचा विकास करण्याबाबत विविध लोकप्रतिनिधींकडून निवेदन वजा मागणी प्राप्त झालेली आहे अशी सर्व निवेदने विचारात घेऊन महासभेच्या मान्यतेनंतर कार्यवाही प्रशासनामार्फत करण्यात येईल.

(५) दिनांक ३१.१२.२०१४ रोजीचे मा.मुख्यमंत्री, मा.प्रधान सचिव, तसेच आयुक्त ठाणे महानगरपालिका यांना उद्देशुन दिलेले एका नागरीकाचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(६) दिनांक ३१.१२.२०१४ चे निवेदने तसेच यापूर्वी महानगरपालिकेकडे प्राप्त झालेल्या विविध निवेदनाच्या अनुषंगाने स्थानिक प्राधिकरण म्हणुन उपरोक्त भाग-४ येथे नमुद केल्याप्रमाणे ठाणे महानगरपालिकेकडून महासभेच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही विचाराधीन आहे.

-----------------

**मुंबई शहरातील रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(५१) * ३८०३ श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील पावसाळयात खराब झालेले अनेक ठिकाणचे रस्ते आणि पदपथांच्या दुरुस्तीची कामे महानगरपालिकेने एकाचवेळी सुरु केल्यामुळे मुंबईतील रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक ठिकाणी लहान-मोठे रस्ते खड्डे खणून ठेवल्यामुळे वाहतुकीची प्रचंड कोंडी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही पदपथावरील पेवरब्लॉक बदलून आठ महिनेही झालेले नसतांना ते काढून नवे पेवरब्लॉक बसविण्याची कामे सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, परिणामी वाहतुकीला अडथळा निर्माण होत असून छोटयामोठया अपघातांच्या प्रमाणात वाढ होवू लागली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त कामे त्वरीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) वाहतुक पोलीसांचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे रस्ता दुरुस्ती व पुनर्बांधणीची कामे पावसाळा संपल्यानंतर त्वरीत हाती घेण्यात येतात व पावसाळा सुरु होण्यापूर्वी पूर्ण केली जातात. सदर कामे करतांना वाहतुकीची कोंडी होणार नाही यासाठी वाहतुक पोलीसांची मदत घेण्यात येते.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही. दुरुस्ती व पुनर्बांधणीचे काम सुरु असतांना वाहतुक व पादचारी यांची योग्य ती काळजी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत घेण्यात येते.

(५) सदर कामे विहित वेळेत करण्याबाबत योग्य ती दक्षता घेण्यात येत आहे.

-----------------

## मौजे अक्कलकोट (जि.सोलापूर) शहरातील फुटाणे चाळ येथे ९ कोटी ३७ हजार रुपये किमतीचा गुटखा जप्त केल्याची घटना

**(५२) * ३६७८ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.प्रकाश गजभिये, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे अक्कलकोट (जि.सोलापूर) शहरातील फुटाणे चाळ येथे ९ कोटी ३७ हजार रुपये किमतीचा गुटखा पोलिसांनी जप्त केल्याची घटना माहे जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर गुटखा साठा करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) प्रश्नात नमूद ठिकाणी रु. ७.३७ लक्ष किमतीचा महाराष्ट्र राज्यात बंदी असलेल्या वेगवेगळया प्रकारचा गुटखा व रु. २ लक्ष किमतीची ओमनी कार असा एकूण रु. ९.३७ लक्ष किंमतीचा मुद्देमाल दि.११/०१/१५ रोजी जप्त करण्यात आला आहे.
(२) व (३) होय.

सदर गुन्ह्यातील निष्पन्न ३ आरोपींनी संगनमताने राज्यात बंदी घातलेल्या पानमसाला, तंबाखू गुटखा, इ. तत्सम उत्पादनाची विक्री, साठा वाहतूक केल्याचे निष्पन्न झाले आहे.

प्रकरणी अन्न सुरक्षा अधिकारी, सोलापूर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अक्कलकोट पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ३/१५ भा.द.वि.कलम १८८, २७३, ३४ अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ चे कलम २६(१), २६(२) (i), २६ (२) (iv) शिक्षापात्र कलम ५९ प्रमाणे गुन्हा दाखल करुन गुन्ह्यातील निष्पन्न ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदरचा गुन्हा जामीनपात्र असल्याने आरोपींना जामीन मंजूर करण्यात आला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास चालू आहे.
(४) विलंब झालेला नाही.

-----------------

**मुंबईतील मेट्रो रेल्वेच्या तिस-या टप्प्याचे काम सुरु करताना नरीमन पॉईंट परिसरातील विस्थापित होणा-या राजकीय पक्षांच्या कार्यालयांना जागा मिळणेबाबत**

**(५३) * ३२९३ श्री.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अनिल भोसले, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.जयवंतराव जाधव, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मेट्रो रेल्वेच्या तिस-या टप्प्याचे काम माहे एप्रिल-मे २०१५ च्यादरम्यान सुरु करण्यासाठी नरीमन पॉईंट परिसरातील विविध राजकीय पक्षांची कार्यालये रिकामी करण्यासंदर्भात एमएमआरडीएने नोटीस पाठवल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राजकिय पक्षाच्या कार्यालयावर नोटीसीप्रमाणे कारवाई झाल्यास पक्ष कार्यालयासाठी पर्यायी जागा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच, या राजकीय पक्षांच्या कार्यालयात राज्यभरातील अनेक नागरीक येत असतात त्यांचे हित पाहून मंत्रालयासमोरील बंगल्यामध्येच या पक्ष कार्यालयांना जागा उपलब्ध करुन देण्यात यावी अशी मागणी पक्ष कार्यालयांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रश्नाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय. राजकीय पक्ष कार्यालय प्रमुखांशी पर्यायी जागा उपलब्ध करण्याबाबत मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाकडे (एमएमआरसी) चर्चा व पुढील प्रक्रिया सुरु आहे.
(३) सामान्य प्रशासन विभागाने आयोजित बैठकीत अशा प्रकारची मागणी करण्यात आलेली आहे. मात्र, अशा प्रकारची लेखी स्वरुपातील मागणी मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाकडे (एमएमआरसी) प्राप्त झालेली नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे जिल्ह्यातील डोंबिवली येथील संदप गावात आंतरजातीय विवाह केल्यामुळे तरूणाच्या कुटुंबियांना समाजातून बहिष्कृत केल्याबाबत**

**(५४) * ३५५४ श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील डोंबिवली येथील संदप गावात राहणाऱ्या संजय सोमा कदम या तरूणाने ३ वर्षापूर्वी दलित समाजातील तरूणीशी आंतरजातीय विवाह केल्यामुळे गाव पंचायतीने त्यांना व त्यांच्या कुटूंबियांना समाजातून बहिष्कृत केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्री.संजय सोमा कदम हे उच्चशिक्षित असून त्यांचा पत्नीसुध्दा अभियंता आहेत असे असताना गावपंचायतीने त्यांचे आईवडील व त्यांना स्वत:ला ठार मारण्याची धमकी देवून एक लाख रूपयाचा दंड सुध्दा ठोठावला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संबंधात चौकशी करण्यात आली आहे काय, तद्नुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिकमधील जुन्या गावठाणांचा मुंबईच्या धर्तीवर पुनर्विकास करण्याकरिता 'क्लस्टर डेव्हलपमेंट योजना' राबविण्याबाबत**

**(५५) * ३४७१ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिकमधील जुन्या गावठाणांचा मुंबईच्या धर्तीवर पुनर्विकास करण्याकरिता “क्लस्टर डेव्हलपमेंट योजना” राबविण्याची दिनांक २४ फेब्रुवारी, २०१४ रोजी वा त्यादरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) सद्यस्थितीत नाशिक शहराची सुधारित प्रारुप विकास योजना तयार करण्याची कार्यवाही नियुक्त अधिकाऱ्यांच्या स्तरावर सुरु असल्याने उक्त निवेदनाची प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी नियुक्त अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**म्हाडाच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना निवृत्त वेतन लागू करण्याबाबत**

**(५६) * ३३८३ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) म्हाडाच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू करण्याची घोषणा दिनांक २१ एप्रिल, १९९९ रोजी शासनाने विधानमंडळात जाहिर केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची अंमलबजावणी न होण्याची कारणे काय आहेत,
(३) सदर पेन्शन योजना लागू करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) होय.
(२) व (३) म्हाडा कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन योजना लागू करण्याबाबत मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर केलेल्या प्रस्तावावर मंत्रिमंडळाने मंत्रिमंडळ बैठकीत चर्चा केली आणि सदर प्रस्ताव मंत्रिमंडळाने अमान्य केला आहे.

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्ती वेतनावर राज्य शासनास आर्थिक भार वाढत असल्यामुळे कोणत्याही आस्थापनेवरील मंडळे / महामंडळे इत्यादी कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन योजना लागू न करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

म्हाडा कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू करण्याबाबत मा.उच्च न्यायालयात विविध व्यक्ती संघटना यांच्यावतीने जनहित याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. या सर्व याचिकांची मा.उच्च न्यायालयाचे खंडपीठासमोर एकत्रित अंतिम सुनावणी होऊन पेन्शनबाबत केलेली मागणी मा.उच्च न्यायालयाचे दि. १९.०३.२०१४ रोजीच्या आदेशान्वये फेटाळून लावण्यात आली. तसेच या आदेशाचा पुर्नविचार होण्यासाठी न्यायालयात दाखल केलेल्या पुर्नविचार याचिकांची एकत्रित सुनावणी होऊन सदर पुर्नविचार याचिका देखील न्यायालयाने दि.१९.०९.२०१४ रोजीच्या आदेशान्वये फेटाळलेल्या आहेत.

-----------------

**पुणे शहरात वाहतूकीची कोंडी कमी करण्यासाठी बी.आर.टी. प्रकल्प पुर्ण करण्याबाबत**

**(५७) * ३१८६ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात वाहतूकीची कोंडी कमी करण्यासाठी बी.आर.टी. प्रकल्प सुरू करण्याचे कार्यवाही करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा बी.आर.टी. प्रकल्प किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे तसेच बी.आर.टी. साठी आवश्यक असणारी आय.टी.एम.एस. सिस्टीम किती कालावधीत कार्यान्वित करण्यात येणार आहे,

(३) अद्याप प्रश्न भाग २ बाबत कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत,

(४) तसेच पुण्यातील बी.आर.टी.प्रकल्प तातडीने पुर्ण करण्यासाठी कोणती विशेष मोहिम राबविण्यात आली आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) पुणे शहरामधील नगर रस्ता, आळंदी व संगमवाडी या रस्त्यावरील एकूण १६ कि.मी. लांबीच्या बीआरटीएस मार्गिकेची स्थापत्य विषयक कामे पुर्ण झाली असून या मार्गावर इंटलिजेंट ट्रान्सपोर्ट मॅनेजमेंट सिस्टीम (आय.टी.एम.एस.) यंत्रणा माहे मे, २०१५ अखेर कार्यान्वित करण्याचे महानगरपालिकेने योजिले आहे.

(४) पुण्यातील बी.आर.टी. प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यासाठी इंटलिजेंट ट्रान्सपोर्ट मॅनेजमेंट सिस्टीम (आ.टी.एम.एस.) यंत्रणा बसविणेचे काम पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.यांचे मार्फत करणेत येत असून, या प्रकल्पाची प्रसिद्धी व जनजागृतीकरीता तज्ञ सल्लागारांमार्फत काम सुरू करणेत आले आहे.

-----------------

**पुणे येथील भिडे वाड्याला राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करणेबाबत**

**(५८) * ३६४५ श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील पहिली मुलींची शाळा पुणे येथील ज्या भिडे वाड्यात सुरू झाली त्या वास्तुला राष्ट्रीय स्मारक घोषित करण्याची मागणी विधानपरिषद सदस्यांनी दिनांक २२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.न्यायालयाने आदेश देऊनही या ऐतिहासिक वास्तुसमोरील अतिक्रमण अद्याप काढण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने दुर्लक्ष केल्यामुळे ही ऐतिहासिक वास्तु जिर्ण आणि मोडकळीस येऊन येथे मद्यधुंद व्यक्तींकडून गैरप्रकार होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विविध सामाजिक संघटना आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी केलेल्या मागणीनुसार भिडेवाड्याला राष्ट्रीय स्मारकाचा दर्जा देण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

भिडे वाडयाची जागा राष्ट्रीय स्मारक करण्यासाठी पुणे महानगरपालिकेने महासभा ठराव क्रमांक ५५७, दिनांक २१.२.२००६ अन्वये पारित केला आहे.

(२) हे खरे नाही.

सदर वास्तुसमोरील सार्वजनिक रस्त्यावर कच्च्या-पक्या स्वरुपात कोणतेही अतिक्रमण नसल्याने अतिक्रमण काढण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) सदर भिडे वाडा हा खाजगी मालकीचा असल्याने त्यावर महानगरपालिकेचे नियंत्रण नाही. सकृतदर्शनी सदर वाडा मोडकळीस आला आहे हे खरे आहे, या ठिकाणी गैरप्रकाराबाबत गुन्हा दाखल झाला नसल्याचे संबंधित पोलिस ठाणे यांनी कळविले आहे.

(४) सदर जागेबाबत सुरु असलेल्या भुसंपादन कार्यवाहीबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन क्रमांक ३०९०/२०१० व रिट पिटीशन क्रमांक ३५१९/२०१० दाखल झाल्या आहेत. यामध्ये मा.न्यायालयाने अंतिम निर्णय होईपर्यंत निवाडा घोषित करु नये, असे आदेश दिले आहेत.

-----------------

## मुंबई शहरात आणि ग्रामीण भागात सुरु असलेल्या बांधकामाच्या ठिकाणी काम करणाऱ्या कंत्राटी मजुरांची नोंद ठेवण्याबाबत

**(५९) * ३७८६ श्री.विजय गिरकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.प्रकाश गजभिये, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संदिप बाजोरिया, श्री.रामराव वडकुते, श्री.अमरसिंह पंडित, श्री.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात आणि ग्रामीण भागात सुरु असलेल्या बांधकामाच्या ठिकाणी काम करणाऱ्या कंत्राटी मजुरांची नोंद ठेवण्यासाठी यंत्रणा नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर यंत्रणा नसल्याने उपेक्षित मजूरांसाठी तयार केलेल्या कायद्याच्या तरतूदी अंतर्गत जमा झालेल्या सुमारे २५०० कोटी रुपयांच्या निधी पैकी ९० कोटी रुपयेच खर्च करण्यात आले असल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निधी कोणत्या कारणासाठी राखीव ठेवला आहे,
(४) तसेच, उपरोक्त प्रश्न भाग (१), (२) व (३) प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे उपकरापोटी जमा झालेल्या रु.२७६५ कोटी रकमेपैकी रु.१६३ कोटी खर्च करण्यात आले आहेत.
(३) उक्त निधी कोणत्याही कारणास्तव राखीव ठेवण्यात असलेला नसून बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी विविध कल्याणकारी योजनांमार्फत वापरला जात आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**लातूर जिल्ह्यातील गनिमी कावा या संघटनेच्या कार्यकर्त्यांने**
**एका प्रेमी युगलास केलेली मारहाण**

**(६०) * २६४९ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्ह्यातील गनिमी कावा या संघटनेच्या कार्यकर्त्यांनी एका प्रेमी युगलास मारहाण करून त्यांची चित्रफित काढून सोशल मिडियाद्वारे प्रसारण केल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन पिडीत युवक युवतीला न्याय देण्यासंदर्भात शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच चौकशीत दोषी आढळून येणा-यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,
दि.१६/०१/२०१५ रोजी प्राप्त तक्रारीनुसार पोलीस स्टेशन, मुरुड गु.र.नं. ०४/१५ कलम ३९५ भा.द.वि. कलम ६६ (अ) माहिती तंत्रज्ञान अधिनियम नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) व (३) उक्त नमूद गुन्ह्याचा तपासात ६ आरोपीविरुध्द पुरावा उपलब्ध असल्याने त्यांना दि.१६/०१/२०१५ रोजी अटक करण्यात आली असून ते सद्या न्यायालयीन कोठडीत आहेत. गुन्ह्यामध्ये आरोपीचे चित्रफितीत आलेले अंगावरील कपडे व मोबाईल फोन हस्तगत केले असून मोबाईल फोन वैज्ञानिक प्रयोगशाळा कलीना मुंबई येथे तपासासाठी पाठविण्यात आले आहेत. गुन्ह्याचा तपास चालू आहे.
(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## मुंबईतील लालबाग गणेश गल्ली मधील एका विकासकाने वापरात असलेली विहीर बुजवून त्यावर बहुमजली इमारत उभारल्याबाबत

**(६१) * ४४७६ डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रिटीश कालीन विहीरींचे संरक्षण करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने काही ठोस नियम तयार केले आहेत. परंतू सदरहू नियमाचे उल्लंघन करुन मुंबईतील लालबाग गणेश गल्ली मधील एका विकासकाने वापरात असलेली विहीर बुजवून त्यावर बहुमजली इमारत उभी केल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अनधिकृत बांधकामाबाबत पालिका अधिकारी व विकासकाचे संगनमत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी राज्य शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने याप्रकरणी संबंधित दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही. सदरहु विहीर बुजवलेली नसून आर.सी.सी. स्लॅबने झाकलेली आहे. सदर विहीरीचे पाणी वापरता यावे यासाठी आर.सी.सी. स्लॅबमध्ये २x३ ची मोकळी जागा सोडून त्यावर जाळी बसविण्यात आली असून सदरची विहीर अस्तित्वात आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील जोगेश्वरी (पू) परिसरातील गटारे उघडी असल्याने मोठया प्रमाणात दुर्गंधी व घाण पसरल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत

**(६२) * ५०३४ श्री.संदिप बाजोरिया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जोगेश्वरी (पूर्व) येथील बांदरेकरवाडी, मजासवाडी, रामवाडी, प्रतापनगर या परिसरातील गटारे उघडी असल्याने मोठया प्रमाणात दुर्गंधी व घाण पसरल्याने नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असून रस्त्यावरून चालणारे नागरिक यामध्ये पडून जखमी होण्याच्या घटना घडत असल्याचे माहे डिसेंबर २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गटारांवर झाकण नसल्याने व त्याची वेळोवेळी साफसफाई होत नसल्याने ठिकठिकाणी कचरा साचून डासांचा प्रादूर्भाव निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू कामाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही. जोगेश्वरी (पूर्व) येथील बांदरेकरवाडी, मजासवाडी, रामवाडी, प्रतापनगर या परिसरातील गटारे ही मुख्यतः बंदिस्त स्वरुपाची असून सदर गटारे वेळावेळी साफ केली जातात व त्यावर वेळोवेळी औषध फवारणी करुन घेतली जाते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तारापूर (जि.पालघर) येथील अणुऊर्जा प्रकल्पात कामगारांची भरती करताना नियमांचे उल्लंघन केल्याबाबत

**(६३) * ४१४३ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापूर (जि.पालघर) अणुऊर्जा प्रकल्प-४ च्या दुरुस्तीसाठी अकुशल व कंत्राटी कामगारांचा वापर करणे हा आंतरराष्ट्रीय सुरक्षा नियमांचा भंग झाल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकल्पात शटडाऊनच्या कामांदरम्यान परराज्यातील सुमारे ३५० ते ४०० कंत्राटी पध्दतीवरील कामगार नियमांचे उल्लंघन करुन भरती केले जात असून एक दिवसाच्या जुजबी प्रशिक्षणानंतर अतिसंवदेनाशील व किरणोत्सर्गाच्या भागामध्ये काम करत असल्याने माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील कामगार दुसऱ्या अणुकेंद्राच्या ठिकाणी काम करतांना फ्रेश व शून्य किरणोत्सर्ग केल्याचा रेकॉर्ड ते दाखवतात व पैशाच्या आमिषाखातर ते स्वत:च्या आरोग्याला धोका निर्माण करतात तसेच किरणोत्सर्गाचा प्रसार करुन इतरांनाही धोका पोहचवतात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (एक) व (दोन) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यानुसार उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) तारापूर (जि.पालघर) येथील अणूऊर्जा प्रकल्पासह देशातील सर्व अणूऊर्जा प्रकल्प हे केंद्र शासनाच्या अणु ऊर्जा विभागाच्या अखत्यारीत येतात. त्यामुळे सदरहू प्रकरणी समुचित शासन हे केंद्र शासन असल्याने याबाबत पुढील कार्यवाही करण्यासंदर्भात केंद्र शासनाच्या, प्रादेशिक कामगार आयुक्त, सायन मुंबई यांना कामगार आयुक्त कार्यालयाद्वारे दिनांक २७/०२/२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील बहुतांश न्यायालयाच्या इमारतीमध्ये मुलभूत सुविधांची कमतरता असल्याबाबत**

**(६४) * ३५०४ श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बहुतांश न्यायालयाच्या इमारतीमध्ये मुलभूत सुविधांची कमतरता असल्याने मा.न्यायधीश, वकील, न्यायालयीन कर्मचारी व सर्वसामान्य नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील प्रत्येक न्यायालयात मुलभूत सुविधा शासनाने पुरविण्यासंदर्भात मा.उच्च न्यायालय प्रशासनाने एक जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) राज्यातील काही न्यायालयांच्या इमारतीमध्ये मूलभूत सुविधांची कमतरता असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) होय.

(३) सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाकडून पक्षकार, वकील, न्यायालयीन अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी नविन प्रसाधनगृहांची निर्मिती, जुन्या प्रसाधनगृहांची दुरुस्ती व बैठक व्यवस्था या अनुषंगाने प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई येथील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींची दुरुस्ती करण्याबाबत**

**(६५) * ३९५६ श्री.राजेंद्र मुळक :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकर प्राप्त इमारतींची दुरुस्ती निधी अभावी रखडली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या इमारतीच्या दुरुस्तीसाठी आवश्यक असलेल्या १५६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) अंशतः खरे आहे.

(२) व (३) सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पामध्ये मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळास उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्तीकरीता शासकीय अंशदानापोटी रु.३८ कोटी व उपकराच्या वसुलीची रक्कम देण्याकरीता रु.५० कोटींची तरतुद करण्यात आली असून त्या रक्कमेपैकी ८५ टक्के रक्कम मंडळास वितरीत करण्यात आली आहे. तर उर्वरीत रक्कम वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. अंशदानापोटी थकीत रु.१००.३१ कोटी व उपकराच्या वसुलीच्या देय रकमेपोटी थकीत रु.५६.३६ कोटींच्या वितरणापोटी पुरवणी मागणीचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

-----------------

**मुंबईत इमारतीबाहेर रस्त्यावर उभ्या करण्यात येणाऱ्या वाहनांवर वाहनतळ शुल्क आकारण्याबाबत**

**(६६) * ३६०४ श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत इमारतीबाहेर रस्त्यावर उभ्या करण्यात येणाऱ्या वाहनांवर वाहनतळ शुल्क आकारण्याचा महानगरपालिकेने माहे जानेवारी, २०१५ मध्ये निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) निवासी इमारतीबाहेर वाहनांचा वाहनशुल्क आकारण्याचा निर्णय घेतल्यामुळे तेथील नागरीकांवर सुमारे १ हजार ८०० रुपयांचा नाहक बोजा पडणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच सदर शुल्क रद्द करण्याबाबत नागरीकांनी महानगरपालिकेकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) मुंबईत दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढत असल्याने व काही इमारती व चाळीत राहणाऱ्यांना त्यांच्या आवारात वाहन उभे करण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने व वाहतुकीस एकसुत्रता आणण्यासाठी महानगरपालिकेने माहे जानेवारी २०१५ चा ठराव क्रमांक १०८४ अन्वये निवासी वाहनतळ योजना अमलात आणली आहे.

(३) होय.

(४) होय.

(५) शासनाने दिनांक २९.०१.२०१५ रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेने मंजुर केलेल्या वाहनतळ योजनेला अंतरीम स्थगिती दिली आहे.

-----------------

**ठाणे परिवहन विभागाला जे.एन.एन.यु.आर.एम योजनेंतर्गत त्वरीत बसेस मिळण्याबाबत**

**(६७) * २९९७ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारने जे.एन.एन.यु.आर.एम. ची योजना गुंडाळण्याचा निर्णय घेतल्याने ठाणे परिवहन सेवेत दाखल होणाऱ्या २३० नवीन बस मिळण्यास विलंब होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कळवा व वागळे आगारात बसेसची कमतरता असल्याने मोठ्या प्रमाणात प्रवाशांचे हाल होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त २३० नवीन बस तातडीने ठाणे परिवहन विभागाला त्वरीत मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाच्या ट्रांझिशन फेज अंतर्गत ठाणे महानगरपालिकेने केंद्र शासनाकडे सादर केलेल्या २२० बस खरेदीसाठी दिलेल्या कार्यादेशाच्या आधारे केंद्र शासनाने रुपये १०७.६३ कोटी प्रकल्प किंमतीस मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने केंद्र शासनाकडून प्रथम हप्त्याचा निधी वितरीत करण्यात आला आहे.

(२) ठाणे महानगरपालिका परिवहन सेवेमार्फत सद्यस्थितीत सरासरी २०० ते २१० बसेस प्रवाशांना दैनंदिन संचलनासाठी उपलब्ध होत असले तरीही प्रवाशांना बसेस कमी उपलब्ध होतात ही वस्तुस्थिती आहे.

(३) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाअंतर्गत मंजूर २२० बसेस खरेदी करणेबाबतचा कार्यादेश ठाणे महानगरपालिकेमार्फत देण्यात आला असून त्यापैकी १५ वोल्वो वातानुकूलित बसेस परिवहन सेवेच्या बस ताफ्यात दाखल झालेल्या आहेत. उर्वरीत बसेस टप्याटप्याने नजिकच्या काळात दाखल होणार आहेत. त्याबाबत आवश्यक ती उपाययोजना ठाणे महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कल्याण-डोबिंवली महानगरपालिका हद्दीतील कल्याणच्या पुर्व भागातील रस्त्याचे विकास आराखड्याप्रमाणे रूंदीकरण करण्याबाबत**

**(६८) * २७३८ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोबिंवली महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील कल्याणच्या पूर्व भागातील कोटमानिवली ते गणपती चौक, या १२ मिटर प्रस्तावित रस्त्यांच्या रूंदीकरणाचे काम चुकीच्या पध्दतीने होत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी महानगरपालिकेकडे व लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात केल्या आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने सदरहू कामाची पाहणी कल्याण-डोबिंवली महानगरपालिकेच्या आयुक्त व महापौर यांनी स्थानिक नगरसेवक, अधिका-यांसह केली असता नागरिकांच्या तक्रारीत तथ्य असल्याचे स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू रस्त्याचे विकास आराखड्याप्रमाणे रूंदीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे महापौर आणि आयुक्त यांनी स्थानिक नगरसेवकांसमवेत सदर कामाची पाहणी केली असता, तक्रारीत तथ्य आढळून आले नाही.
(३) महानगरपालिकेकडून विकास आराखड्यानुसार रस्त्याचे रुंदीकरण करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर महानगरपालिकेतर्फे पटवर्धन मैदानाजवळील यशवंत स्टेडियमच्या बाजूला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक बांधण्याबाबत**

**(६९) * ३८५९ श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर महानगरपालिकेतर्फे पटवर्धन मैदानाजवळील यशवंत स्टेडियमच्या बाजूला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक बांधण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विचाराधीन प्रस्तावावर अंतिम निर्णय झाला आहे काय,
(३) असल्यास, यशवंत स्टेडियमच्या बाजूला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक बांधणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) महानगरपालिकेने ठराव मंजूर करुन शासनाकडे पाठविलेला आहे.
(२) नाही.
(३) प्रस्तुत प्रकरणी शासनस्तरावर प्रस्तावाची छाननी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कल्याण (जि.ठाणे) शहाड आणि आंबिवली रेल्वे स्थानकादरम्यान मोहने रेल्वे फाटकाजवळ मागील उड्डाणपूलाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(७०) * २९७२ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) शहाड आणि आंबिवली रेल्वे स्थानकादरम्यान मोहने रेल्वे फाटकाजवळ मागील चार वर्षापासून काम सुरु असलेला उड्डाणपूल दोन्ही बाजूंच्या संलग्न रस्त्यांसाठी जमीन नसल्याने प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर उड्डाणपुलाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, उक्त प्रकरणी कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

माहे जानेवारी २०१५ मध्ये मौजे वडवली येथील जागेत श्री.प्रविण गड्डा या उड्डाणपुलाचे काम करण्यास हरकत घेतली आहे.

(२) व (३) शहाड आंबिवली स्थानकादरम्यान लेव्हल क्रॉसिंग गेट क्र.४७ बी येथील मोहने वडवली येथील प्रस्तावित रेल्वे उड्डाणपुलाचे काम मध्य रेल्वेच्या सहकार्याने खर्च विभागणी तत्वावर हाती घेण्यात आले आहे. माहे जानेवारी २०१५ मध्ये मौजे वडवली सर्व्हे नं. ३२/८ अ येथील जागेत श्री.प्रविण गड्डा यांनी पुलाचे काम करण्यास पूर्वी दिलेली सहमती मागे घेऊन हरकत घेतली आहे. त्यामुळे एकूण ५० मीटर लांबीच्या परिसरातील पाईल फाऊंडेशनचे काम सद्यस्थितीत थांबविण्यात आले आहे. सदर उड्डाणपुलाचे काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेली जमीन हस्तांतरणीय विकास हक्काच्या माध्यमातून (टी.डी.आर.) व आवश्यकता भासल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२६ नुसार कार्यवाही करुन भुसंपादनातील अडचणी दुर करण्याबाबत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सांगली जिल्ह्यातील पोलीस विभागात काम करणा-या महिला पोलीस कर्मचा-यास लग्नाचे अमिष दाखवून बलात्कार केल्याबाबत**

**(७१) * २९४३ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील पोलीस विभागात काम करणाऱ्या महिला पोलीस कर्मचा-यास लग्नाचे आमिष दाखवून बलात्कार केल्याची घटना दिनांक १० जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, अशा आशयाची फिर्याद प्राप्त झालेली आहे.
(२) उक्त प्रकरणाचा तपास करण्यात आली असून, या प्रकरणातील आरोपी व पोलीस विभागात पोलीस शिपाई महिला यांचेविरुद्ध विश्रामबाग पोलीस ठाण्यात भा.दं.वि.कलम ३७६, ४२०, ३२३, ५०४, ५०६, ३४ नुसार गु.क्र. ६/२०१५ नोंदविण्यात आला आहे. याप्रकरणी पुरुष आरोपीस दिनांक ९.१.२०१५ रोजी अटक करण्यात आली असून, आरोपी महिला पोलीस शिपाई हिला दिनांक १३.१.२०१५ रोजी निलंबित केले आहे. याबाबतचा पुढील पोलीस तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात नव्या पार्किंग धोरणानुसार वाहन घरासमोर पार्किंग न केल्यास वाहन मालकास दंड आकारण्याचा घेतलेला निर्णय**

**(७२) * ४१०० श्री.राहुल नार्वेकर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नव्या पार्किंग धोरणानुसार वाहन घरासमोर पार्किंग न केल्यास वाहन मालकास दंड आकारण्याचा निर्णय माहे, जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाने घेतल्याने नागरिकात असंतोषाचे वातावरण पसरले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्या नागरीकांना घरासमोर वाहन उभे करण्यास जागा नाही तसेच ज्या इमारतीमध्ये पार्किंग व्यवस्था उपलब्ध नाही त्यांना दंड न आकारणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वाशिम जिल्हा परिषदेतील माध्यमिक शिक्षण विभागाचे तत्कालीन शिक्षणाधिकारी व काही संस्थांचे संचालक यांनी पद मान्यता देताना केलेला गैरव्यवहार**

**(७३) * २७७५ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्हा परिषदेतील माध्यमिक शिक्षण विभागाचे तत्कालीन शिक्षणाधिकारी श्री.विश्वास लबडे व कार्यरत शिक्षणाधिकारी संजय तेलगोटे यांच्यासह काही संस्थांचे संचालक यांच्या विरूध्द जिल्ह्यातील अनसिंग, आसेगांव आणि कारंजा पोलीस स्टेशनमध्ये पद मान्यता घोटाळा प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी प्राथमिक चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशी अहवाल थोडक्यात काय आहे व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) वाशिम जिल्हा परिषदेतील माध्यमिक शिक्षण विभागाचे तत्कालीन शिक्षणाधिकारी तसेच कार्यरत शिक्षणाधिकारी तसेच काही संस्थांचे संचालक व संस्थेतील अधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द वाशिम जिल्ह्यातील ६ पोलीस स्टेशन मध्ये गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. त्याची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे.

१. पोलीस ठाणे वाशिम शहर गु.र.नं. ९/१५ अन्वये शिक्षणधिकारी व इतर ५ शिक्षक यांनी संगनमत करुन, शिक्षक अनुदानित माध्यमिक शाळेत शिक्षक समायोजन पदाचा गैरवापर करुन दि. २०/०८/२०१४ ते २०/१०/२०१४ या कालावधीमध्ये सहाय्यक शिक्षक पदाचे बनावट आदेश निर्गमित करुन शासनाची फसवणूक केली.

२. पोलीस ठाणे मंगरुळपीर गु.र.नं.१३/१५ अन्वये नवघरे प्रयोगशाळा परिचर यांनी संगनमत करुन फिर्यादी यांसकडून रु.६ लाख घेवून नोकरीचे आमिष दाखवून खोट्या आदेशान्वये फिर्यादीची फसवणुक केली.

३. पोलीस ठाणे मंगरुळपीर गु.र.नं. १४/१५ अन्वये तत्कालीन शिक्षणाधिकारी बाबा विद्यालय धोत्रा चे संचालक मंडळाचे सदस्य यांनी आपसांत संगनमत करुन शिपाई पदाच्या भरतीची परवानगी नसतांना खोटे दस्तऐवजान्वये आरोपी यांची शिपाई या पदावर नेमणुक करुन त्याच्याच वेतनातून रक्कम उचल घेऊन शासनाची फसवणूक केली.

४. पोलीस ठाणे आसेगाव गु.र.नं.१/१५ अन्वये श्री.संत गाडगे महाराज विद्यालय, लिपिक व शिपाई या पदांची मान्यता नसतांना खोटे दस्तऐवज तयार करुन शासनाची फसवणूक केली.

५. पोलीस ठाणे अनसिंग गु.र.नं.१/१५ अन्वये स्याद-व्याद एज्युकेशन सोसायटीचे प.दी.जैन विद्यालय, अनसिंग येथे खोटे दस्तऐवजाच्या आधारे बनावट नेमणुका करुन शासनाच्या रकमेचा अपहार केला व सदर पुरावे नष्ट करुन शासनाची फसवणूक केली.

६. पोलीस ठाणे कारंजा ग्रामीण गु.र.नं. १/१५ अन्वये ग्राम विकास मंडळ पोहा संचालित वसंत विद्यालय, पोहा येथे प्रयोगशाळा सहाय्यक या पदावर बोगस नेमणुकीस मान्यता देवुन शासनाची फसवणुक केली.

सदर गुन्ह्यांचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील गिरगांव चौपाटीवरील लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांच्या समाधीस्थळाच्या नामकरणाचा ठराव शासनाकडे प्रलंबित असल्याबाबत**

**(७४) * ३०६८ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गिरगांव चौपाटीवरील लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांच्या समाधीस्थळाच्या नामकरणाचा ठराव एकमताने संमत करून मुंबई महापालिकेने राज्य शासनाकडे पाठवून आज चार वर्षाचा कालावधी होऊनही नामकरणाची नस्ती शासनाकडे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने गिरगांव चौपाटीच्या "स्वराज्यभूमी" नामकरणास अनुकूलता दर्शवून प्रस्ताव मंजूर करावा अशी मागणी लोकमान्य टिळक स्वराज्यभूमी स्मारक समितीने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नामकरणास मंजूरी मिळण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आहे,

(५) तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) मुंबईतील गिरगांव चौपाटीवरील लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांच्या समाधीस्थळाचे "स्वराज्यभूमी" असे नामकरण करण्याच्या प्रस्तावास शासनाने मान्यता दिली असून याबाबतचे आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही चालू आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्य बालहक्क आयोगाच्या अध्यक्षा मिनाक्षी जयस्वाल यांच्या हत्येबाबत**

**(७५) * ३९११ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य बालहक्क आयोगाच्या अध्यक्षा मिनाक्षी जयस्वाल यांची हत्या दिनांक १९ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास खारघर सेक्टर १७ मधील वास्तुविहार येथील सिलेब्रेशन या इमारतीत झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निदर्शनास आले व तदनुसार हत्या करणाऱ्या आरोपींचा शोध घेऊन त्यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी खारघर पोलीस स्टेशन येथे ग्रक्र. ३८५/१४ भांदवि कलम ३०२, ३९७, ३४ दिनांक २०.१२.२०१४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून, सदर गुन्ह्यात ४ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

सदरचा गुन्हा तपासधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नांदेड महापालिकेकडे पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने विकास कामांची झालेली दुरवस्था**

**(७६) * ४४०० श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरात सध्या ठिकठिकाणी रस्त्यावर मोठमोठे खड्डे खोदून तसेच ठेवल्याने येथील रस्त्याला दुरवस्था प्राप्त झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुरु-ता-गद्दी सोहळा, जेएनएनयुआरएम, नगरोत्थान, बीसएयुपी या योजनेअंतर्गत शहरात कोटयवधी रुपयांचा निधी खर्च करुन विकास कामे करण्यात आली होती परंतू या योजनेअंतर्गत झालेल्या कामाच्या देखभालीसाठी संबंधित महापालिकेकडे निधी नसल्याने सदरहू कामाची दुरवस्था झाली असुन यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विंलबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) जेएनएनयुआरएम, नगरोत्थान, बीसएयुपी तसेच इतर विविध योजने अंतर्गत झालेल्या विकास कामाची देखभाल व दुरूस्तीसाठी महानगरपालिका अंतर्गत मिळणा-या उत्पन्नानुसार तरतुद करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई पोलिसांना समुद्रकिनाऱ्यावर गस्त घालण्यासाठी ॲम्फिबियस, सी-लेग अशा अनेक गाडया विना वापर पडून असल्याबाबत**

**(७७) * ५४५६ श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त : तारांकित प्रश्न क्रमांक १८२४ ला दिनांक १० डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर समुद्रकिनाऱ्यावर गस्त घालण्यासाठी ॲम्फिबियस, सी-लेग अशा अनेक गाडया मुंबई पोलिसांच्या ताफ्यात दाखल झाल्या परंतू सदरहू वाहनांचा वापर होत नसल्याने ही वाहने दादर समुद्र किनाऱ्यांवर विना वापर पडून असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईचा वरील दहशतवादी हल्ला हा समुद्रमार्गे करण्यात आला होता हे लक्षात घेता वरिल गाडयांची व बोटींची खरेदी करण्यात आली परंतु या वाहनांचा व बोटींचा वापर करण्यात येत नसल्याप्रकरणी शासन त्वरीत चौकशी करुन काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई पोलीस दलाकडील १९ ॲम्फिबियस वाहनांपैकी सध्या १५ वाहने कार्यरत असून ४ वाहनांच्या दुरुस्तीची कार्यवाही चालू आहे. तसेच ४ सी-लेग्स् बोटींच्या निकामीकरणाचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील नगरपरिषदेमध्ये मुख्याधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(७८) * २९२० श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नगरपरिषदेमध्ये मुख्याधिकाऱ्यांची पदे मोठया प्रमाणात रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे रिक्त असल्यामुळे मुख्याधिकारी पदाचा भार नायब तहसिलदार व तहसिलदार यांच्यावर टाकण्यात येत आल्यामुळे विकास कामांना अडथळे निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एका सीओ कडे तीन-तीन नगरपंचायतीचा भार असल्यामुळे उक्त मुख्याधिकारी पदाचा भार सोपवितांना शासनाचे निकष लावण्यात येत आहेत काय,

(४) तसेच नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांचे वेतन गेल्या कांही वर्षापासून नगरपरिषद फंडातून अदा करण्यात येत होते परंतु मर्यादित व कमी आर्थिक उत्पन्नाची साधने असल्यामुळे अनेक नगरपरिषदांना मुख्याधिका-यांचे वेतन अदा करणे कठीण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून मुख्याधिका-यांची पदे व त्यांचे वेतन याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशतः खरे आहे.

(२) व (३) नाही.

(४) अंशतः खरे आहे. काही नगर परिषदांमध्ये उत्पन्नाचे स्त्रोत व करांचे वसुलीचे प्रमाण अत्यंत कमी असल्याने मुख्याधिकारी व कर्मचारी यांचे वेतन वेळेवर होत नाही.

(५) रिक्त पदे विचारात घेवुन २३ परिविक्षाधीन मुख्याधिका-यांना दि. ०१ एप्रिल, २०१५ पासून नियमित मुख्याधिकारी पदावर नियुक्ती देण्याचा निर्णय देण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे जिल्हयात मोठ्या प्रमाणावर अल्पवयीन मुलांचे होत असलेले अपहरण**

**(७९) * ४०७५ श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हयात मोठ्या प्रमाणावर अल्पवयीन मुलांचे अपहरण झाल्याच्या घटना दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुंषगाने आतापर्यंत याप्रकरणातील किती आरोपींना अटक करून त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे,
(४) अद्यापी, कोणतीही कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.
(३) ठाणे ग्रामीण जिल्हयात माहे जानेवारी २०१५ मध्ये अल्पवयीन मुल हरविले बाबत २४ गुन्हे दाखल असुन त्यात एकूण १० मुले व १४ मुली हरविले असुन त्यापैकी ०३ मुले व १२ मुलींचा तपास लागला असून ७ मुले व २ मुलींचा तपास चालू आहे.
ठाणे ग्रामीण जिल्हयात दाखल २४ गुन्हयात एकूण ०६ आरोपी अटक करण्यात आलेले आहेत. दाखल गुन्हयांचा तपास करुन ८ गुन्हे निकाली काढले असुन १६ गुन्हे पोलीस तपासावर प्रलंबित आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ठाणे येथील वारकरी भवन व ज्येष्ठ नागरिक भवन हया वस्तु खुल्या करण्याबाबत**

**(८०) * ३५२६ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०१२ मध्ये ठाणे महानगरपालिकेमार्फत राज्यातून वारी-दिंडीला जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी ठाणे येथील राममारुती रोडवरील गजानन महाराज चौकात वारकरी भवन तसेच जेष्ठ नागरिक भवन बांधण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अडीच वर्षापेक्षा अधिक कालावधी होऊन सदरचे वारकरी भवन तसेच ज्येष्ठ नागरिक भवन अद्यापही खुले करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरचे वारकरी भवनासाठी लाखो रुपयांचा खर्च होऊनही वारकरी भवन अद्याप खुले न करण्याची कारणे काय व त्यास जबाबदार कोण आहेत,
(४) तसेच त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

तथापि, "मुन्सिपल परपज" या आरक्षणाखाली ठाणे महानगरपालिकेच्या ताब्यात येणाऱ्या राम मारुती रोडवरील इमारतीचा वापर "वारकरी भवन व जेष्ठ नागरिक भवन" म्हणून करण्यास महासभेने ठराव क्र. २६०, दिनांक १७.११.२०१२ अन्वये मान्यता दिली. सदर इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन इमारतीचा ताबा दिनांक १७.११.२०१२ रोजी ठाणे महानगरपालिकेला प्राप्त झाला आहे.

(२) हे खरे नाही.

सदर वारकरी भवन तसेच जेष्ठ नागरीक भवन ठाणे महानगरपालिकेच्या ताब्यात आल्यापासून म्हणजेच दिनांक १७.११.२०१२ पासून वापरास खुले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) सदर वारकरी भवन व जेष्ठ नागरीक भवन वापरासाठी दोन संस्थानी मागणी केली आहे. त्यामध्ये जेष्ठ नागरीक संघ मध्यवर्ती समिती, ठाणे यांनी विनामुल्य मागणी केली असून वारकरी साहित्य परिषद, ठाणे जिल्हा यांनीदेखील जागेच्या वापरासाठी मागणी केली आहे.

याशिवाय संसद सदस्य, ठाणे लोकसभा मतदार संघ यांनीदेखील वारकरी भवन व जेष्ठ नागरीक भवन यामधील जागा जेष्ठ नागरीक संस्थेस विनामुल्य देण्याची विनंती केली आहे.

ठाणे महानगरपालिकेच्या मालकीच्या जागा नाममात्र भाड्याने / विनामुल्य वापरासाठी आलेल्या मागण्या विचारात घेऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ नुसार महासभेपुढे वस्तुस्थितीदर्शक प्रस्ताव ठेवण्याची प्रशासनाने तयारी केलेली आहे.

-----------------

## झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पासाठी वास्तूरचनाकाराची नियुक्ती करणे वा रद्द करणे याबाबत

**(८१) * ३८०४ श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पासाठी वास्तूरचनाकाराची नियुक्ती करणे वा रद्द करणे याबाबत प्राधिकरणाने काढलेल्या परिपत्रकामुळे विकासकांची मनमानी वाढली असून हा अधिकार वापरत विकासक मनात येईल त्या वास्तूरचनाकाराला काढून टाकणे आणि कौन्सिल ऑफ आर्किटेक्टचे सदस्य नसलेल्या वास्तुरचनाकाराची नियुक्ती करण्यासारखे प्रकार करीत असल्याने याचे नुकसान झोपु प्रकल्पाला झाले असून अनेक प्रकल्प प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त परिपत्रकामुळे वास्तुरचनाकारांमध्ये कमालीची अस्वस्थता पसरली आहे तसेच सदर परिपत्रकाचा वापर वास्तुरचनाकार कायद्याचा भंग असल्याचे कौन्सिल ऑफ आर्किटेक्टने म्हटले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) हे खरे नाही.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे वास्तुविशारद यांच्या सेवा समाप्त करुन नविन वास्तुविशारद यांची नियुक्ती करण्याबाबतच्या तक्रारी प्राप्त होतात. त्यास अनुसरुन विहित कार्यपध्दती निर्धारित करण्याच्या अनुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून दिनांक ४.१.२०४ रोजी कार्यालयीन आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. त्यामध्ये विहित कार्यपध्दती निर्धारित करण्यात आली असून सदरहू कार्यपध्दतीचा अवलंब करुन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे विकासकाकडून रितसर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर वास्तुविशारद यांची सेवा समाप्त करुन नविन वास्तुविशारदाची नियुक्ती करण्याच्या प्रस्तावास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून मान्यता देण्यात येते.

(२) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या उपरोक्त दिनांक ४.१.२०१४ च्या कार्यालयीन आदेशासंदर्भात श्री.पी.एस.चमनकर व इतर यांनी मा.मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका क्रमांक १०१५/२०१४ दाखल केली असून हे प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे शहरामध्ये रिलायन्सच्यावतीने उभारण्यात येणाऱ्या मोबाईल टॉवर्स उभारणीच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(८२) * ३६८४ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अनिल भोसले, श्री.सतिश चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.किरण पावसकर, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरामध्ये सद्यस्थितीत रिलायन्सच्यावतीने उभारण्यात येणाऱ्या मोबाईल टॉवर्सच्या कामात ३५० कोटीचा गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

ठाणे शहरामध्ये रिलायन्सच्या वतीने उभारण्यात येणा-या मोबाईल टॉवर्सबाबत सादर केलेल्या प्रस्तावाची छाननी करुन व नियमाप्रमाणे शुल्क आकारणी करुन परवानगी देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत असल्याने रिलायन्सच्यावतीने उभारण्यात येणा-या मोबाईल टॉवर्सच्या कामात गैरव्यवहार झाल्याचे ठाणे महानगरपालिकेच्या निदर्शनास आलेले नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे येथील अनेक इमारती मोडकळीस आल्याबाबत**

**(८३) * ३२८६ श्री.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील अनेक इमारती मोडकळीस आल्याने त्या कोसळणाच्या स्थितीत आहेत त्यांना पुनर्बांधणीसाठी मुंबई डी.सी. रुल ३३ (७) प्रमाणे पुण्यात परवानगी देण्यात येणार आहे का,

(२) असल्यास, राज्य शासन याबाबतीत पुढाकार घेऊन काही उपाययोजना करणार आहे काय,

(३) कारवाई केली अथवा करणार असल्यास त्याचा तपशिल काय,

(४) सदर तपशिल उपलब्ध नसल्यास त्या मागील विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) मुंबई शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीमधील नियम क्र.३३(७) ची तरतूद ही उपकर प्राप्त (cessed) इमारतींसाठी असून मुंबई शहरापुरती (Island City) मर्यादीत आहे. बशी तरतूद पुणे महानगरपालिका क्षेत्रासाठीच्या मंजुर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये समाविष्ट नाही. मात्र पुणे शहराच्या मुळ हद्दीची विकास योजना विकास नियंत्रण नियमावलीसह महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २६ अन्वये प्रसिध्द करण्यात आली असून यामध्ये दाट वस्तीच्या क्षेत्रात समूह विकास धोरणांतर्गत (Cluster Development) ३० वर्षापेक्षा जुन्या निवासी व वाणिज्य मिळकतींच्या पुनर्विकास तसेच म्हाडा कॉलनी विकास/पुनर्विकास संबंधीचे नियम प्रस्तावित करण्यात आले आहेत.

-----------------

**ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर महापालिका क्षेत्रात वडोल गाव येथिल काही शाळांनी वाढीव बांधकाम केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवीताला धोका निर्माण झाला आहे**

**(८४) * ३५५३ श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर महापालिका क्षेत्रात वडोल गाव येथे सेंट जोसेफ इंग्रजी माध्यमाची तसेच कॅम्प तीन येथे चोपडा कोर्ट परिसरात कॉन्व्हेंट स्कुल या शाळा चालकाने महानगरपालिकेची किंवा शासनाची परवानगी न घेता वाढीव बांधकाम केल्यामुळे या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जीवीताला धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संबंधात चौकशी करण्यात आली आहे काय, तद्नुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही. उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील वडोल गांव येथील सेंट जोसेफ बेथनी कॉन्हेंट स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या शाळेचे वाढीव बांधकाम नियमाधीन करण्यास मंजुरी मिळाली आहे. तथापि सदर शाळेच्या आवारात वाढीव बांधकाम केल्यामुळे मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम २६०, २६८(१) अन्वये उल्हासनगर महापालिकेने संबधितास वाढीव अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत नोटीस बजावली होती. परंतु सदर ठिकाणी शाळा भतर असल्यामुळे व इमारत रिकामी न केल्यामुळे निष्कासनाची कार्यवाही केली नाही. तथापि प्रचलित नियमांच्या अधीन राहून निष्कासनाची कार्यवाही तात्काळ करण्याच्या सूचना उल्हासनगर महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.

लॉर्ड कॉन्व्हेंट स्कूल, चोपडा कोर्ट, उल्हासनगर-३ या शाळेच्या विकासकाने मंजुर नकाशा व्यतिरिक्त वाढीव बांधकाम केल्यामुळे महापालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२, ५३ अन्वये नोटीस बजावण्यात आली आहे. त्यावर सदर विकासकाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्रमांक ६३६१/२०१४ दाखल केली असून, मा.न्यायालयाने सदर बांधकामाचे निष्कासन करण्यास स्थगिती आदेश दिलेले आहेत. सदर प्रकरण अद्यापि न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई उपनगरातील गोरेगाव येथील म्हाडाच्या जागेवरील पत्रा चाळींच्या जमिनीचे भाग पाडून म्हाडाचे झालेले नुकसान

**(८५) * ३३८५ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील गोरेगाव मधील म्हाडाच्या ४२ एकर जागेवरील पत्रा चाळीच्या जमिनीचे भाग पाडून या जागा परस्पर विकासकांना विकल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे म्हाडाचे अकराशे कोटी रुपयांचे नुकसान झाले असल्याचे ऑडीट नोटमध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली वा करण्यात येत आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१), (२) व (३) मुंबई उपनगरातील गोरेगांव मधील सिध्दार्थ नगर, सहकारी (गृहनिर्माण) संस्था, म्हाडा व गुरु आशिष कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट जि. यांच्यामध्ये दि.१०.४.२००८ रोजी पत्राचाळ या जुन्या म्हाडा वसाहतीच्या संयुक्त विकासाकरिता सुधारित त्रिपक्षीय करारनामा करण्यात आला होता. त्यानुसार सदर वसाहतीच्या एकूण ४० एकर (१,६१,८७४ चौ.मी) क्षेत्राचा एकत्रित पुनर्विकास करणे अपेक्षित होते. तथापि, प्रत्यक्ष मोजणीमध्ये प्रकल्पाचे क्षेत्रफळ १,९३,५९९.९० चौ.मी. इतके वाढल्याने व त्यामुळे म्हाडाच्या हिश्श्याच्या क्षेत्रफळात वाढ होत असल्याने सुधारित त्रिपक्षीय निक्षिती व सुधारणा विलेख दि.७.१०.२०११ रोजी करण्यात आलेला आहे. त्यानुसार म्हाडाच्या वाट्याला १,४८,१५१.०७

चौ.मी. इतके बांधकाम क्षेत्रफळ उपलब्ध होणे अपेक्षित होते. सदर विलंखामधील कलम ४ मध्ये वाढीव क्षेत्रफळ विचारात घेऊन प्रकल्पाची वित्तीय व्यवहार्यता तपासून बांधकाम क्षेत्राच्या वाटपाबाबत पुनर्तपासणी करुन निर्णय घेण्याचे अधिकार उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांना देण्यात आलेले आहेत.

वरील प्रस्तावाच्या अनुषंगाने निवासी लेखापरिक्षण विभाग यांच्यामार्फत २०११ मध्ये करण्यात आलेल्या लेखापरिक्षणाचे या प्रकल्पात म्हाडाचे सुमारे १००० कोटीचे नुकसान संभवत आसल्याबाबत नमूद करण्यात आले होते. तथापि, त्यानंतर ऑडिट मसुदा परिच्छेद दि.२५.५.२०१२ अन्वये म्हाडाचे २९६.६५ कोटी इतके नुकसान संभवत असल्याचे नमूद केले आहे.

सदर प्रस्तावाचा आढावा घेऊन त्यामध्ये काही सुधारणा करणे आवश्यक आहे, असे पाटल्याने उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांनी दि.१६.५.२०११ रोजीचा नोटीस जारी केली.

तसेच तदनंतर उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांनी दि.१८.१.२०१४ रोजी संबंधीत संस्था व विकासकाला नोटीस देऊन म्हाडास प्रत्यक्ष गुतवणूक, बांधकाम क्षेत्रफळ व पुनर्वसन क्षेत्र, संक्रमण गाळयाचे क्षेत्र तसेच वाढीव जमिनीच्या क्षेत्राच्या च. क्षे.नि.मधील ५० टक्के पाटा मिळून एकूण २,२८,९६१.१३ इतके बांधकाम क्षेत्रफळ म्हाडाच्या हिस्सा म्हणून उपलब्ध करुन देण्यास कळविले.

मुळ विकासकाने अन्य ७ विकासकांना विक्रीच्या बांधकात क्षेत्रफळाची विक्री केल्याचे मुंबई मंडळाच्या निदर्शनास आल्याचे मुंबई मंडळाने मुळ विकासक आणि संबंधित गहनिर्माण संस्था यांच्याकडून दि.२२.१०.२०१४ च्या पत्रान्वये वस्तुस्थिती/स्पष्टीकरण मागविण्यास आले असून समाधानकारक खुलासा प्राप्त न झाल्यास कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल असे कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे महानगरपालिका क्षेत्रात नवीन गावांचा समावेश करण्यात आल्याने सदर महानगरपालिकेवरील भार कमी करण्यासाठी नवीन महानगरपालिका स्थापन करण्याबाबत**

**(८६) * ३१८७ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिका क्षेत्रात नवीन गावांचा समावेश करण्यात आल्याने महानगरपालिकेवर अतिरिक्त भार येत असून याकारणाने महानगरपालिकेचे कामकाज विलंबाने होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे महानगरपालिकेवरील भार कमी करण्यासाठी नवीन महानगरपालिका स्थापन करण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(४) तसेच, उक्त प्रश्न भाग (२) बाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुणे महानगरपालिका क्षेत्रात नवीन गावांच्या समावेशनाबाबत अद्याप अंतिम निर्णय झाला नसल्याने, महानगरपालिकेवर अतिरिक्त भार येण्याचा किंवा कामकाज विलंबाने होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(२) नाही.

तथापि, स्थानिक लोकप्रतिनिधींनी हडपसर महानगरपालिका निर्माण करावी अशी लेखी मागणी शासनाकडे केली असून, त्याबाबत जिल्हाधिकारी पुणे व आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांचेकडून दिनांक ४.१०.२०१४ च्या पत्रान्वये अहवाल मागविण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) जिल्हाधिकारी पुणे व आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर अहवाल विचारात घेवून, आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात येईल.

-----------------

**राज्यात पोलीस विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(८७) * ३६४९ श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात पोलीस विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या व त्यात अप्पर महासंचालक २, महानिरीक्षक ६, उपमहानिरीक्षक ६, पोलीस अधिक्षक ६६, पोलीस उपअधिक्षक २२०, पोलीस निरीक्षक १८८ व इतर अधिकाऱ्यांची ६७७० पदे रिक्त असल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोलिस दलातील अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांमुळे कामाचा ताण उपलब्ध अधिकाऱ्यांवर पडत असल्यामुळे त्याचा परिणाम तपास यंत्रणावर होतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निलंबित अधिकारी-कर्मचारी यांना विहित मुदतीत निर्णय घेऊन सेवेत सामावून न घेतल्यामुळे त्यांच्या वेतनाचा आर्थिक ताण शासनावर पडून त्यांची पदेही रिक्त राहत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त रिक्त पदे तातडीने भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) राज्य पोलीस दलातील अधिकारी व कर्मचा-यांच्या रिक्त पदांची संख्या ११८४५ एवढी आहे.

(२) रिक्त पदांमुळे उपलब्ध अधिका-यांवर कामाचा ताण पडतो, हे खरे आहे. तथापि, उपलब्ध अधिका-यांकडून काम करून घेण्यात येत असल्याने तपासावर त्याचा परिणाम होत नाही.

(३) होय.

(४) रिक्त पदे सरळसेवा व पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई स्थित दाभोळ खाडीय भोई समाजातील ४०० कुटूंबांना त्यांच्या गावकीने वाळीत टाकल्याबाबत**

**(८८) * २६५० श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई स्थित दाभोळ खाडीय भोई समाजातील ४०० कुटूंबांना त्यांच्या गावकीने वाळीत टाकण्याची घटना दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंतरजातीय विवाह केल्यामुळे व जातीच्या नापसंत मुलीशी विवाह केल्याने हा बहिष्कार आजही कायम आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या घटनेची चौकशी करुन वाळीत टाकलेल्या कुटुंबियांना न्याय देण्यासंदर्भात व अशा घटना टाळण्यासाठी शासनाने काय कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, चौकशीत दोषी आढळुन आलेल्यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजी दाभोळ खाडीय भोई समाजातील ४०० कुटूंबाना त्यांच्या गावकीने वाळीत टाकण्याची घटना निदर्शनास आलेली नाही.

परंतू यापूर्वी दिनांक ०३/०९/२०१० रोजी तसेच दिनांक १२/०१/२०१३ रोजी श्री.जयवंत यशवंत पडवळ, रा.मुंबई यांनी अखिल दाभोळ खाडीय भोई समाज मुंबई या जात पंचायतीने गेल्या ३० वर्षाच्या कालावधीत भोई जातीतील ज्या तरुण तरुणींनी आंतर जातीय विवाह केलेले आहेत अशा जवळ जवळ ४००-५०० तरुण तरुणींना भोई जातीतून बहिष्कृत/वाळीत टाकले आहे अशा मजकूराचे अर्ज गुहागर पोलीस ठाण्यात सादर केलेले होते.

(२) आंतरजातीय विवाह केल्यामुळे व जातीच्या नापसंत मुलीशी विवाह केल्यामुळे सद्य:स्थितीत कोणावरही बहिष्कार टाकलेला नाही.

(३) व (४) सदर अर्जाच्या अनुषंगाने चौकशी मध्ये सदरच्या तक्रारी गैरसमजुतीने केल्याचे अर्जदारांनी मान्य केलेले आहे व अशी कोणतीही घटना घडली नसल्याचे सांगितले आहे.

भोई समाज विकास संघटना यांनी महाराष्ट्र राज्य व इतर यांचेविरुध्द मुंबई हायकोर्ट येथे फौजदारी जनहित याचिका क्रमांक ०४/२०१२ दाखल केलेली होती. सदर जनहित याचिकेच्या अनुषंगाने अखिल दाभोळ खाडी भोई समाज यांच्यावतीने न्यायालयामध्ये जबाब दिलेला आहे की, अशा प्रकारचा कोणताही सामाजिक बहिष्कार अखिल दाभोळ खाडी भोई समाज मुंबई या जातपंचायतीने टाकलेला नाही. मा. न्यायालयाने ग्राह्य मानुन सदरची जनहित याचिका निकाली काढलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अहमदनगर जिल्ह्यातील तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एकविरा चौकात मटका जुगार अड्डा चालत असूनही पोलीसांचे होत असलेले दुर्लक्ष**

**(८९) * ४४८२ डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एकविरा चौकात भर वर्दळीच्या ठिकाणी मटका जुगार अड्डा चालत असूनही पोलिसांचे दुर्लक्ष होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत गुन्हेगारांना कायदा, सुव्यवस्थेबाबतची भितीच राहिली नसल्याचे जनमाणसांत बोलले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) प्रश्नात नमूद ठिकाणी कोणत्याही प्रकारचा जुगार अड्डा आढळून आला नाही. तथापि तोफखाना पोलीस स्टेशन हद्दीत १५ ठिकाणी मटका जुगार आढळून आला आहे.

(२) हे खरे नाही.

पोलीस स्टेशन तोफखाना हद्दीत जुगार व अवैध धंद्याच्या १५ प्रकरणात कारवाई केलेली आहे.

(३) तोफखाना पोलीस स्टेशन हद्दीत १५ ठिकाणी मटका जुगार आढळून आला, त्या ठिकाणी जवळपास ६५,०००/- रुपयाची रोख रक्कम व मटका जुगारीची साधने जप्त करण्यात आलेली असून त्याबाबत पोलीस स्टेशनला मुंबई जुगार ॲक्ट कलम १२ (अ) प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

**राज्यातील पोलीस पाटलांचे मानधन ७५००/- करण्याचा घेतलेला निर्णय**

**(९०) * ५०३५ श्री.संदिप बाजोरिया, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त : तारांकित प्रश्न क्रमांक १११ ला दिनांक २४ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलीस पाटलांचे मानधन ७५००/- करण्याचा निर्णय माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यांत आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार आतापर्यंत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पोलीस पाटील संघटनांच्या मागण्यांबाबत तात्कालिन मंत्री (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली दि. १०.७.२०१४ रोजी झालेल्या बैठकीमध्ये पोलीस पाटलांचे सध्याचे मानधन रु. ३,०००/- वाढवून रु. ७,५०० /- एवढे करण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात यावा असा निर्णय घेण्यात आला आहे.

(२) त्या अनुषंगाने पोलीस पाटलांच्या मानधनात वाढ करण्याच्या प्रस्तावावर वित्त विभागाचे अभिप्राय घेण्यात आले असून पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे,

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बांद्रा बॅण्ड स्टॅण्ड येथील मन्नत बंगल्याबाहेरील रस्त्यावर अतिक्रमण करुन अनधिकृतपणे रॅम्प बांधल्याबाबत**

**(९१) * ३४९४ श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बांद्रा बॅण्ड स्टॅण्ड येथील मन्नत बंगल्याबाहेरील रस्त्यावर अतिक्रमण करुन अनधिकृतपणे सन २००६ मध्ये बांधलेल्या रॅम्पवर महापालिका प्रशासनाकडून अद्याप कारवाई झाली नसल्याचे माहे डिसेंबर, २०१४ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) बांद्रा बॅण्ड स्टॅण्ड येथील एच.के.भाभा रस्ता व माउंटमेरी रस्ता यांना जोडणाऱ्या रस्त्यावर सन १९८० मध्ये ९.१५ मीटर एवढी नियमित रेषा महापालिका अधिनियमान्वये मंजुर करण्यात आलेली होती. परंतु सन २००३ मध्ये सदर नियमित रेषा वगळण्याचा निर्णय महानगरपालिका प्रशासनाने घेतल्यामुळे मन्नत बंगला येथील बांधलेला रॅम्प सदर नियमित रेषेच्या बाहेर असल्यामुळे महानगरपालिकेने कारवाई करण्याचा प्रश्न निर्माण झाला नाही. तथापि सदर रॅम्प व रस्ता यांच्या पातळीत सुमारे १ ते १ १/२ फुटाचा फरक असल्यामुळे माऊंटमेरी येथे जाणाऱ्या भाविकांची गैरसोय होत असल्याच्या तक्रारी स्थानिक नागरिकांकडून प्राप्त होत होत्या. या तक्रारी विचारात घेऊन महानगरपालिका

प्रशासनाने दिनांक ०५ फेब्रुवारी, २०१५ रोजी, या पूर्वी सन २००३ मध्ये ९.१५ मीटर नियमित रेषा वगळण्याचा घेतलेला निर्णय रद्द करुन मुंबई महापालिका अधिनियम १८८८ अन्वये सदर रॅम्पच्या जागेचे संपादन करण्याचा निर्णय घेतला व त्यानंतर दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१५ रोजी संबंधित मालकास ७ दिवसांची नोटीस देऊन, तद्नंतर रॅम्पच्या बांधकामाचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने निष्कासन केले.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाच्या थकलेल्या देयकांची चौकशी करणेबाबत**

**(९२) * ३९५८ श्री.राजेंद्र मुळक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेने सन २०१३-२०१४ साली केलेल्या कामांपैकी तब्बल २४२ कोटी ७४ लाखांच्या बिलांचा भार यंदाच्या दिनांक १९ जानेवारी, २०१५ रोजी निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकट्या सार्वजनिक बांधकाम विभागाचा गेल्या वर्षीच्या बिले २२२ कोटी रु. आहे,

(३) असल्यास, शासनाने यासंदर्भात लक्ष घालून आर्थिक अनियमतपणाची चौकशी केली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

सन २०१३-१४ व यापूर्वी केलेल्या कामापैकी रुपये २४२.७४ कोटी ही रक्कम बिलांचा अधिभार नसुन दिनांक ०१.०४.२०१४ रोजी सुरु असलेल्या कामांच्या रक्कमेचे दायित्व आहे.

(२) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात सार्वजनिक बांधकाम विभागाकरीता (भांडवली व महसुली खर्च) महासभेने मंजुर केलेल्या एकूण अर्थसंकल्पीय तरतुदीमध्ये, सन २०१३-१४ व त्यापूर्वीच्या सुरु असलेल्या कामांच्या एकूण दायित्वपैकी, रक्कम रुपये २२२ कोटी रकमेच्या दायित्वाचा समावेश आहे.

(३) सदरचे दायित्व हे भौतिक आणि आर्थिक नियोजनाप्रमाणे असून त्याबाबत आर्थिक अनियमितता झालेली नसल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात जबरी चोरीचे प्रमाण वाढल्याबाबत**

**(९३) * ३००३ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जबरी चोरीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत असून देशात महाराष्ट्रात सर्वाधिक जबरी चोरीचे प्रमाण आढळून आले असून राज्यात मुंबईचा जबरी चो-यामध्ये पहिला क्रमांक तर पुण्याचा तिसरा क्रमांक लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जबरी चोरीचे वाढत असलेले प्रमाण त्वरीत थांबविण्याबाबत तसेच गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) राज्यातील सर्व पोलीस प्रमुखांना गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत सविस्तर सुचना पाठविण्यात आल्या आहेत. त्यानुसार, पोलीस स्टेशन हद्दीत बीट मार्शल, मोबाईल पायी गस्त, साध्या वेषातील गस्त, कोंबीग ऑपरेशन, पिटर मोबाईल गस्त रात्रंदिवस ठेवण्यात आली आहे. महिला छेडछाड प्रतिबंधक पथके स्थापन करण्यात आली आहेत. तसेच, शाळा, कॉलेज, मार्केट, रेल्वे स्टेशन, गर्दीची ठिकाणे इत्यादी ठिकाणी गस्त वाढविण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कल्याण शहराच्या आग्रा रोडवरील मध्यवर्ती भागात असलेल्या सी.एन.जी. पंपामुळे होणारी वाहतुक कोंडी**

**(९४) * २७४० श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण (जि.ठाणे) आग्रा रोडवरील के.सी.गांधी शाळेच्या लगत असलेल्या सी.एन.जी. पंपावर लागणा-या रिक्षांच्या लांबच लांब रांगा व दुसरीकडे डी.मार्ट या दुकानासमोर होणारे बेशिस्त पार्किंगमुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्यामुळे नागरीकांना त्रास सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कल्याणच्या आग्रा रोडवरील पार्क होणा-या वाहनांवर जामर लावण्याची कारवाई करणारी कल्याण वाहतूक नियंत्रण शाखा या सी.एन.जी.पंप आणि डी.मार्ट मुळे होणा-या वाहतूक कोंडीकडे जाणीपूर्वक दुर्लक्ष करत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच या सी.एन.जी.पंपाला लागूनच के.सी.गांधी विद्यालय ही शाळा असल्याने पंपावरील वाहनांच्या गर्दीमुळे शालेय विद्यार्थ्यांनाही त्रास होऊन अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या रस्त्यावरून प्रवास करणा-या नागरिकांना होत असलेला वाहतूक कोंडीचा त्रास कमी करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सी.एन.जी.पंपावरती रिक्षांची लांब रांग लागते आणि डी मार्ट समोर वाहनांचे वर्दळ असते, असे निदर्शनास आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) कल्याणमधील आग्रा रोडवरील के.सी. गांधी शाळेजवळील सी.एन.जी.पंपावर येणाऱ्या रिक्षाच्या रांगेवर नियंत्रण ठेवण्यासाठी पंप मालकाने ट्रॅफिक वॉर्डन नेमलेला आहे. डी मार्टने त्यांच्या कर्मचारी देखील वाहने बेशिस्तपणे पार्क होऊ नये याकरीता नेमलेला आहे. तसेच

याठिकाणी वाहतूक विभागाकडील एका कर्मचाऱ्याची नेमणूक करण्यात आली आहे. या ठिकाणी वाहतूक समस्या होऊ नये याकरीता वाहतूक विभागाकडील बीट मार्शल व पोलीस अधिकारी गस्तीदरम्यान वाहतूकीस अडथळा होणार नाही याची दक्षता घेत असतात आणि वाहतूकीस अडथळा ठरणाऱ्या वाहनांवर कारवाई केली जाते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील एमएमआरडीएच्या धर्तीवर नागपूर जिल्ह्यात एनएमआरडीए स्थापन करण्याबाबत**

**(९५) * ३८६१ श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील एमएमआरडीएच्या धर्तीवर नागपूर जिल्ह्यात एनएमआरडीए मध्ये रुपांतर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) नागपूर सुधार प्रन्यासला नागपूर महानगर क्षेत्रासाठी क्षेत्र विकास प्राधिकरण म्हणून शासन निर्णय क्र.टिपीएस-२४१४/४५१/प्र.क्र.२३१/२०१४/नवि-९, दिनांक २३ डिसेंबर, २०१४ अन्वये नियुक्त करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई महापालिकेत होत असलेल्या भ्रष्टाचाराबाबत**

**(९६) * २९७८ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.सुधीर तांबे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लाचलुचपत प्रतिबंध विभागाचे महासंचालक प्रविण दिक्षित यांनी मुंबई महानगरपालिकेत होत असलेल्या भ्रष्टाचाराबाबत केलेले वक्तव्य गंभीर असून या वक्तव्याची चौकशी करुन मुंबई महापालिकेतील भ्रष्टाचाराची मा.राज्यपालांनी आपल्या अखत्यारित न्यायालयीन चौकशी करावी अशी मागणी मा.लोकप्रतिनिधी यांनी केल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नाची शासनाने दखल घेऊन महानगरपालिकेत होत असलेल्या भ्रष्टाचाराबाबत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबई महानगरपालिकेतील भ्रष्टाचाराची न्यायालयीन चौकशी करण्याची मागणी प्राप्त झालेली नाही. तथापि विरोधी पक्षनेता, मुंबई महानगरपालिका यांनी मुंबई महानगरपालिकेतील भ्रष्टाचाराची चौकशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत किंवा सी.आय.डी. मार्फत करण्याची मागणी दिनांक ०२/०१/२०१५ च्या निवेदनान्वये केली आहे.
(२) व (३) मुंबई महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी, नगरसेवक यांचेविरुध्द सापळे, अपसंपदा व गैरव्यवहार संदर्भात प्राप्त तक्रारींवर तसेच गुप्त व उघड चौकशीबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचे स्तरावर चौकशी सुरु आहे. यासंदर्भात शासनास अद्याप प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात विशेषत: विदर्भात महिलांवर होणाऱ्या अत्याचाराबाबत**

**(९७) * २९४७ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: विदर्भात महिलावरील अत्याचार वाढला असून सन २००९ ते २०१४ या सहा वर्षाच्या कालावधीत चंद्रपूर जिल्ह्यात ३५७ महिलावरील अत्याचार झाल्याची नोंद माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात महिलांवरील अत्याचार व छेडछाड करणा-या किती आरोपीवर आतापर्यंत कारवाई केली वा करण्यांत येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, चंद्रपूर जिल्ह्यात सन २००९ ते माहे ऑक्टोबर २०१४ पर्यंत भा.दं.वि.कलम ३७९ अंतर्गत लैंगिक अत्याचाराचे एकूण ३५७ गुन्हे नोंद झालेले आहेत.
(२) व (३) अशाप्रकारच्या घटना घडल्यास तातडीने गुन्ह्यांची नोंद करुन योग्य ती कायदेशीर कार्यवाही आरोपींवर करण्यात येते. उपरोक्त ३५७ गुह्यांमध्ये ४१५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. महिलांवरील अत्याचार रोखण्याकरीता महिलांसाठी हेल्पलाईन क्रमांक १०९१ सुरु करण्यात आला असून, छेडछाडीवर प्रतिबंध करण्याकरीता २४ तास पेट्रोलिंगकरीता पीसीआर व्हॅन, महिला सुरक्षा पथक व दोन पोलीस कर्मचा-यांची मोटर सायकल मार्शलची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालये या ठिकाणी पोलीसांमार्फत विशेष शिबीरांचे आयोजन करुन जनजागृती करण्यात येत आहे.

-----------------

**ठाणे शहरात बेकायदा वृक्षतोड होत असल्याबाबत**

**(९८) * ४११६ श्री.राहुल नार्वेकर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे शहरात मे.आदित्य एंटरप्रायझेस प्रोजेक्ट व मे.डिझाइन कॉन्सोर्टियम या कपंनीच्या विकासकांकडून केमिकलचा वापर करुन मोठ्या प्रमाणावर बेकायदा वृक्षतोड करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने संबंधित विकासकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

मात्र दिनांक १३.०७.२०१४ रोजी प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या पाहणीमध्ये वृक्षाचा शेंडा मोडून, खोडाजवळ / मुळाजवळ खोदाई करुन तसेच एक वृक्ष समूळ तोडल्याने एकूण ०६ वृक्षांना हानी पोहचविल्याचे निदर्शनास आले.
(२) व (३) या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ अन्वये संबंधित विकासकाविरुध्द जिल्हा न्यायालय, ठाणे येथे क्रिमिनल केस नं.९४/२०१५ अन्वये फौजदारी दावा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय शिक्षण संस्था (भंडारा) या संस्थेचे कार्यवाह नत्थुजी फरांडे व त्यांच्या मुलाने केलेला गैरव्यवहार

**(९९) * ५१२७ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय शिक्षण संस्था भंडारा या संस्थेचे कार्यवाह नत्थुजी फरांडे व त्यांच्या मुलाने सन २०११ व २०१२ मध्ये पद्मा नंदेश्वर यांचेकडून शाळेत नोकरी देण्याचे आमिष दाखवून वेगवेगळया तारखांना पैसे घेऊन ९ लाख रुपयांची फसवणूक केल्याची तक्रार पोलीस स्टेशन लाखनी (जि.भंडारा) येथे दिनांक २६ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास दाखल केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय निदर्शनास आले,
(४) नसल्यास, चौकशीस विलंब लागण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.
(३) सदर प्रकरणी राष्ट्रीय शिक्षण संस्था, भंडारा या संस्थेचे कार्यवाह व त्यांचा मुलगा यांनी एका महिलेस नोकरी देण्याचे अमिष दाखवून तिच्याकडून रु. ९,५०,०००/- एवढे पैसे घेतले व तिला बनावट नियुक्ती पत्र देऊन तिची फसवणूक केल्याचे निदर्शनास आल्यामुळे मा.जेएमएफसी कोर्ट लाखनी यांच्या आदेशान्वये वरील दोघांवर पोलीस स्टेशन लाखनी येथे अप.क्र.१०१५ भा.दं.वि. कलम ४२०, ४६८, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून, गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे आर्णी (जि.यवतमाळ) येथील अरुणावती नदीच्या पात्रात**
**बेवारस स्थितीत सापडलेला शस्त्रसाठा**

**(१००) * ३९१८ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आर्णी (जि.यवतमाळ) येथील अरुणावती नदीच्या पात्रात एका बेवारस पेटीत तीन हॅन्ड ग्रेनेडसह ३५ काडतुसे माहे, डिसेंबर, २०१४ च्या तिस-या सप्ताहात वा त्यादरम्यान सापडली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मौजे आर्णी, जि.यवतमाळ येथील अरुणावती नदीच्या पात्रात एका बेवारस पेटीत तीन हॅन्ड ग्रेनेड व २९ काडतुसे सापडली.

(२) व (३) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन आर्णी येथे अज्ञात आरोपी विरुध्द गु.र.क्र. ३२३८/१४, भा.द.वि. कलम २८६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या चौकशीत तीन हॅन्ड ग्रेनेडसह २९ काडतूसे सापडली असून ती रासायनिक तपासणीसाठी सहाय्यक संचालक क्षेपणास्त्र विभाग न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोग शाळा, नागपूर येथे पाठविण्यात आली आहेत. तपासणी अहवाल अद्याप अप्राप्त आहे. गुन्ह्याच्या तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.